सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

## ग्राम विकास व पंचायत राज विभाग

## राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण




# महा आवास

## त्रैमासिक

# क्षणचित्रे



प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत लाभार्थ्यांना मंजुरी पत्र व हप्ता वितरण कार्यक्रमा प्रसंगी मा.केंद्रीय मंत्री, गृह व सहकार मंत्रालय, भारत सरकार श्री.अमित शाह यांचे स्वागत करतांना मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज श्री.जयकुमार गोरे



प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत लाभार्थ्यांना मंजुरी पत्र व हप्ता वितरण कार्यक्रमा प्रसंगी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री.देवेंद्र फडणवीस यांचे स्वागत करतांना मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज श्री.जयकुमार गोरे



प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत लाभार्थ्यांना मंजुरी पत्र व हप्ता वितरण कार्यक्रमा प्रसंगी मा.उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री.एकनाथ शिंदे यांचे स्वागत करतांना मा.राज्यमंत्री, ग्राम विकास व पंचायत राज श्री.योगेश कदम



प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत लाभार्थ्यांना मंजुरी पत्र व हप्ता वितरण कार्यक्रमा प्रसंगी मा.उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री.अजित पवार यांचे स्वागत करतांना मा.राज्यमंत्री, ग्राम विकास व पंचायत राज श्री.योगेश कदम

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# ग्राम विकास विभाग

## संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष – ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय

## महा आवास

| | |
|---|---|
| मार्गदर्शक | श्री. एकनाथ डवले, भा.प्र.से.<br>प्रधान सचिव,<br>ग्राम विकास व पंचायत राज विभाग |
| मुख्य संपादक | डॉ. राजाराम दिघे<br>संचालक,<br>ग्रामीण गृहनिर्माण, महाराष्ट्र राज्य |
| प्रबंध संपादक | नीलेश काळे, उप संचालक<br>राजलक्ष्मी येरपुडे, उप संचालक<br>सुनिल मोरे, सहा. संचालक (लेखा)<br>अपर्णा पाटणे, सहा. संचालक (लेखा) |
| कार्यकारी संपादक | दिनेश मोवळे,<br>राज्य माहिती, शिक्षण व संवाद तज्ञ |
| सहयोगी संपादक | डॉ. संघरत्न सोनवणे<br>राम आघाव<br>परमेश्वर शेलार<br>माधुरी चौधरी |
| मुख्यपृष्ठ मांडणी व सजावट | दिनेश मोवळे,<br>राज्य माहिती, शिक्षण व संवाद तज्ञ |
| संपादकीय पत्ता | संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-<br>ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय<br>४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन,<br>सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई - ४००६१४ |
| संकेत स्थळ | www.pmayg.nic.in<br>www.mahaawaas.org |
| ईमेल | directoriayruralhousing@gmail.com |
| दूरध्वनी क्रमांक | ०२२ - २७५६१८२४ |

वर्ष ५ वे । अंक १९ वा । जानेवारी ते मार्च २०२५

## अनुक्रमणिका


| अं.क्र. | तपशिल | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | संपादकीय | १ |
| २ | प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत लाभार्थ्यांना मंजुरीपत्र व पहिला हप्ता वितरण | ३ |
| ३ | महा आवास अभियान २०२४-२५ | ७ |
| ४ | विविध उपक्रमांचा मागोवा<br>क्षमता बांधणी उपक्रम | १० |
| | संनियंत्रण व मूल्यमापन उपक्रम | १२ |
| | माहिती, शिक्षण व संवाद उपक्रम | १४ |
| | समन्वय उपक्रम | १६ |
| | केंद्र व राज्य सरकार यांना ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रासंबंधित पॉलिसी इनपुट | १९ |
| ५ | ग्रामीण गृहनिर्माण योजनांचा संचित प्रगती अहवाल<br>प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-१ | २० |
| | प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ | २१ |
| | रमाई आवास योजना | २२ |
| | शबरी आवास योजना | २३ |
| | पारधी आवास योजना | २४ |
| | आदिम आवास योजना | २५ |
| | प्रधानमंत्री-जनजाती आदिवासी न्याय महाअभियान | २५ |
| | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजना | २६ |
| | यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना | २६ |
| | मोदी आवास घरकुल योजना | २७ |
| ६ | ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रातील नाविन्यपूर्ण उपक्रम/ यशोगाथा | २८ |
| ७ | फोटो गॅलरी | ३४ |
| ८ | मिडिया कवरेज | ३५ |


महा आवास हेल्पलाईन क्रमांक - १८०० २२ ०१९



**डॉ. राजाराम दिघे**
**संचालक, ग्रामीण गृहनिर्माण, महाराष्ट्र राज्य**

जानेवारी ते मार्च २०२५ या तिमाहीने महाराष्ट्राच्या ग्रामीण गृहनिर्माण पटलावर एका नव्या, गतिमान आणि आशादायी अध्यायाची नोंद केली आहे. केंद्र सरकारच्या 'सर्वांसाठी घरे' या व्यापक ध्येयाला मूर्तरूप देण्यासाठी राज्य शासनाने उचललेली पाऊले, विशेषतः प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ च्या अंमलबजावणीत अधिक प्रभावी ठरली.

दिनांक २३ डिसेंबर २०२४ रोजी पुण्यात झालेल्या किसान एवं ग्रामीण विकास लाभार्थी सम्मेलनामध्ये मा.केंद्रीय मंत्री, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार श्री. शिवराज सिंह चौहान यांनी महाराष्ट्रासाठी १३.२९ लक्ष अतिरिक्त घरांची घोषणा केली होती. याच पार्श्वभूमीवर, मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून आणि मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज श्री. जयकुमार गोरे यांच्या नेतृत्वाखाली दिनांक ०१ जानेवारी ते १० एप्रिल २०२५ या १०० दिवसांच्या कालावधीसाठी राबविण्यात येत असलेले 'महा आवास अभियान २०२४-२५' हे या संपूर्ण प्रक्रियेला निर्णायक गती देणारे ठरले आहे. या अभियानाच्या पहिल्या तीन महिन्यांतच राज्याने अभूतपूर्व कामगिरी केली आहे.

या १०० दिवसीय महा आवास अभियानाचा आणि एकूणच ग्रामीण गृहनिर्माणातील प्रगतीचा परमोच्च बिंदू ठरला तो दिनांक २२ फेब्रुवारी २०२५ रोजी पुणे येथील श्री.शिवछत्रपती क्रीडा संकुल, बालेवाडी येथे संपन्न झालेला ऐतिहासिक कार्यक्रम. देशाचे मा.केंद्रीय मंत्री, गृह व सहकार मंत्रालय, भारत सरकार श्री. अमित शाह यांच्या शुभहस्ते आणि मा.मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली, तसेच मा. उप मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे आणि मा.उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत २० लक्ष घरकुलांच्या मंजुरी पत्रांचे वितरण आणि त्यापैकी १० लक्ष लाभार्थ्यांना पहिल्या हप्त्याचे थेट बँक खात्यात वितरण एका क्लिकवर करण्यात आले.

हा सोहळा केवळ प्रतीकात्मक नव्हता; पुणे जिल्ह्यातील पाच प्रातिनिधिक लाभार्थ्यांना मंचावर मंजुरी पत्रे देण्यात आली, तर त्याचवेळी राज्यभरातील जिल्हा, तालुका आणि ग्रामपंचायत स्तरावर हजारो लोकप्रतिनिधी, अधिकारी आणि लाभार्थी दूरदृश्य प्रणालीद्वारे या सोहळ्यात सहभागी झाले होते.

मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी घरकुल अनुदानात वाढ करून ते आता सुमारे २ लाख रुपयांपेक्षा जास्त झाल्याचे नमूद केले. तर मा. केंद्रीय गृह व सहकार मंत्री श्री. अमित शाह यांनी एकाच वेळी २० लाख घरांना मंजुरी देणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरल्याचा गौरवपूर्ण उल्लेख केला. तसेच राज्य सरकारच्या भूमीहिनांना जागा खरेदीसाठी १ लाख रुपये अर्थसहाय्य देण्याच्या निर्णयाचे कौतुक केले. मा.ग्राम विकास व पंचायत राज मंत्री श्री. जयकुमार गोरे यांनी १०० दिवसीय कार्यक्रमाचे उद्दिष्ट केवळ ४५ दिवसात पूर्ण केल्याचा अभिमानास्पद उल्लेख केला. तर मा.उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांनी आपल्या ३५ वर्षांच्या राजकीय कारकिर्दीत इतक्या मोठ्या संख्येने लाभार्थ्यांना एकाच वेळी लाभ मिळताना प्रथमच पाहत असल्याचे सांगितले. मा.उप मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांनी लाखो कुटुंबांचे 'स्वीट होम'चे स्वप्न पूर्ण होत असल्याचे सांगितले.

'१०० दिवसीय महा आवास अभियान २०२४-२५' हे केवळ एका योजनेपुरते मर्यादित नव्हते, तर त्यात केंद्र व राज्य पुरस्कृत सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांचा समावेश होता. या अभियानाच्या पहिल्या तिमाहीतील योजनानिहाय प्रगती आणि कार्यपद्धती अधिक सविस्तर पाहिल्यास त्याची व्यापकता लक्षात येते.

पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेतील अनुदान १ लाख रुपयांपर्यंत वाढवण्याबरोबरच, शासकीय जमिनी विनामूल्य देणे, अतिक्रमणे नियमानुकूल करणे, तसेच बक्षीसपत्र, संमतीपत्र, भाडेपट्टा अशा विविध मार्गांचा प्रभावी वापर करून गरजू लाभार्थ्यांना जागेची उपलब्धता सुनिश्चित करण्यात आली. केवळ मंजुरीवर न थांबता, लाभार्थी मेळावे घेऊन मंजुरी पत्र त्वरीत वितरित करणे, घरकुल बांधकामाबाबत तांत्रिक मार्गदर्शन करणे आणि भूमिपूजन कार्यक्रम आयोजित करून प्रत्यक्ष कामाला सुरुवात करणे यावर भर देण्यात आला. तसेच घरकुलाच्या भौतिक प्रगतीनुसार पुढचे हप्ते विनाविलंब आणि स्थानिक

पातळीवर कार्यक्रम आयोजित करून वितरित केले.

अनेक कारणांमुळे रखडलेल्या (Delayed Houses) घरांचा प्रश्न सोडवण्यासाठी कारणांचे विश्लेषण करून, प्रसंगी तालुका कायदेविषयक सहाय्य समितीच्या मदतीने 'लोक अदालत' किंवा इतर मार्गांनी लाभार्थ्यांना प्रवृत्त करण्यात आले. पूर्ण होऊ न शकणाऱ्या घरांबाबत मार्गदर्शक सूचनांनुसार Refund/Remand प्रक्रिया राबवून भविष्यात घरे प्रलंबित राहणार नाहीत याची दक्षता घेण्यात आली. गुणवत्ता आणि पूर्णत्वावर भर देवून मंजूर घरकुले केवळ कागदावर नव्हे, तर भौतिकदृष्ट्या पूर्ण करण्यासाठी सरपंच, ग्रामसेवक, बचत गट, अंगणवाडी/आशा कर्मचारी, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता अशा सर्व स्थानिक घटकांना सक्रिय करून गुणवत्तापूर्ण आणि वेगवान बांधकामासाठी प्रयत्न करण्यात आले. सर्वांगीण विकासासाठी घरकुलाला केवळ निवाऱ्याचे साधन न मानता, लाभार्थ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी विविध शासकीय योजनांशी कृतीसंगम साधण्यात आला.

या अभियानाचे वैशिष्ट्य म्हणजे केवळ पारंपरिक पद्धतीने काम न करता, अंमलबजावणीत गतिमानता आणि गुणवत्ता आणण्यासाठी अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम (Innovations/Best Practices) जाणीवपूर्वक राबवण्यात आले. यामध्ये लॅंड बॅंक तयार करणे, सॅण्ड बॅंक तयार करणे, घरकुल मार्ट सुरू करणे, वाळूला पर्याय म्हणून क्रश सॅण्ड, सिमेंट ब्लॉक, फ्लाय ॲश ब्रिक्स, इंटर लॉकिंग/हॉलो ब्रिक्स यांचा वापर करणे, घरांसाठी स्थानिक, किफायतशीर व नैसर्गिक आपत्तीरोधक तंत्रज्ञानाचा वापर करणे, मॉडेल हाऊसेस उभारणे, डेमो हाऊसचा वापर लाभार्थ्यांच्या प्रत्यक्ष भेटीचे आयोजन व कॉप-शॉप सुरू करणे, लाभार्थ्यांना गृहकर्ज मिळवून देणे, घरांवर योजनेचा लोगो व पती-पत्नीचे नाव लिहिणे, मालमत्ता नोंदी घेणे आणि क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडून प्रभावी संनियंत्रणासाठी 'एरिया ऑफिसर ॲप'चा वापर करणे, इ. चा समावेश होता.

या सर्व कार्याला दिशा देण्यासाठी आणि योग्य संनियंत्रण ठेवण्यासाठी क्षमता बांधणी आणि मूल्यांकनावरही विशेष भर देण्यात आला. विभाग, जिल्हा, तालुका आणि अगदी ग्राम स्तरावर कार्यशाळा घेण्यात आल्या. ग्रामपंचायतींमध्ये 'ग्राम कृती गट' स्थापन करण्यात आले. लाभार्थ्यांसाठी वेळोवेळी मेळावे घेऊन त्यांना मार्गदर्शन आणि प्रोत्साहन देण्यात आले.

मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी 'सामाजिक क्षेत्र वॉररूम' मध्ये स्वतः आढावा बैठका घेवून आवश्यक निर्देश दिले.मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज श्री.जयकुमार गोरे यांनी पुणे, कोकण, नाशिक, अमरावती, नागपूर आणि औरंगाबाद विभागांच्या स्वतंत्र बैठका घेऊन उद्दिष्टपूर्तीसाठी अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. मी स्वतः जानेवारी-फेब्रुवारी महिन्यात सातारा, सांगली, नाशिक, अहमदनगर जिल्ह्यांत प्रत्यक्ष भेट देऊन कामांची पाहणी केली.

१०० दिवसीय या महा आवास अभियानाच्या यशामध्ये केवळ आकडे आणि प्रशासकीय प्रक्रियाच नाहीत, तर त्यातून साकारलेल्या हजारो कुटुंबांच्या स्वप्नांचाही समावेश आहे. जरी वैयक्तिक लाभार्थ्यांच्या सविस्तर यशोगाथांचा उल्लेख मर्यादित असला तरी, 'महा आवास अभियान' हे स्वतःच सामूहिक यशोगाथांचे प्रतीक आहे. राज्यातील बेघर तसेच कच्च्या घरामध्ये राहणाऱ्या लाभार्थ्यांना त्यांच्या हक्काचे पक्के घर मिळवून देण्यासाठी भारत सरकारच्या केंद्रीय ग्रामविकास मंत्रालयाच्या सूचनेनुसार राज्यात प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत Awaas+2024 Survey आणि Mobile App बाबत मास्टर ट्रेनर्ससाठी विशेष प्रशिक्षणाचे आयोजन दिनांक ११ व १२ मार्च २०२५ रोजी नवी मुंबई येथे आयोजित करण्यात आले होते.

माहे जानेवारी ते मार्च २०२५ या तिमाहीत महाराष्ट्राने ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रात केवळ उद्दिष्टपूर्तीच केली नाही, तर अंमलबजावणीची एक नवी, अधिक कार्यक्षम आणि लोकाभिमुख प्रणाली विकसित करण्याचा प्रयत्न केला. २० लाख घरांना मंजुरी आणि १० लाख घरांना पहिल्या हप्त्याचे वितरण हे प्रचंड मोठे यश आहे, जे ग्रामविकास व पंचायतराज विभागाची कटिबद्धता, प्रशासकीय यंत्रणेची तत्परता आणि नाविन्यपूर्ण उपक्रमांच्या यशस्वी अंमलबजावणीमुळे शक्य झाले आहे. भूमीहिनांना आधार देणे, प्रलंबित कामे मार्गी लावणे, इतर योजनांशी कृतीसंगम साधणे आणि तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करणे यातून एक सर्वांगीण दृष्टिकोन दिसून येतो. अभियानातील उत्कृष्ट कार्याचा गौरव करण्यासाठी 'महा आवास अभियान पुरस्कार २०२४-२५' देण्याची घोषणा निश्चितच अधिक चांगल्या कामासाठी प्रोत्साहन देईल. लाखो कुटुंबांच्या चेहऱ्यावर स्वतःच्या हक्काच्या घराचे स्वप्न साकार होताना दिसणारे समाधान हेच या महाअभियानाचे खरे यश आहे. हा वेग आणि ही तळमळ यापुढेही कायम ठेवून 'सर्वांसाठी घरे' हे केवळ स्वप्न न राहता लवकरच वास्तवात उतरेल, यात शंका नाही.

मागील अंकाप्रमाणेच हा अंकही आपल्याला नक्कीच आवडेल, अशी आम्हाला खात्री आहे. आपल्याला पुढील वाटचालीसाठी अनेक शुभेच्छा!

**डॉ. राजाराम दिघे**
**संचालक, ग्रामीण गृहनिर्माण,**
**महाराष्ट्र राज्य**

### प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत

# २० लक्ष लाभार्थ्यांना मंजुरी पत्र वितरण व १० लक्ष लाभार्थ्यांना प्रथम हप्ता वितरण कार्यक्रम

दिनांक २३ डिसेंबर, २०२४ रोजी संपन्न झालेल्या आई.सी.ए.आर.-अटारी, पुणे येथील किसान एंव ग्रामीण विकास लाभार्थी संम्मेलनामध्ये मा.मंत्री, ग्रामीण विकास व कृषि एवं किसान कल्याण मंत्रालय, भारत सरकार श्री.शिवराज सिंह चौहान यांनी प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत सन २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये महाराष्ट्र राज्यासाठी १३,२९,६७८ घरांचे अतिरिक्त लक्ष मंजुरीची घोषणा केली. तसेच याबाबतचे पत्रही मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री.देवेंद्र फडणवीस यांना दिले.



त्यानुसार महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील गरीबांसाठी १९ लाख ६६ हजार घरकुलांचे उद्दिष्ट मिळाले असून देशातील कोणत्याही राज्यापेक्षा ही संख्या जास्त असून आजपर्यंत एका राज्याला एका वर्षात मिळालेली ही सर्वाधिक घरे आहे. या उद्दिष्टपूर्तीसाठी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री.देवेंद्र फडणवीस यांनी १०० दिवसांचा विशेष कार्यक्रम व मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज श्री.जयकुमार गोरे यांनी दिनांक ०१ जानेवारी, २०२५ ते दिनांक १० एप्रिल, २०२५ या १०० दिवसांच्या कालावधीत ‘महा आवास अभियान २०२४-२५' राबविण्याचा निर्णय घेतला.त्याचेच फलस्वरूप महाराष्ट्र राज्यात अत्यंत अल्प कालावधीत विक्रमी २० लक्ष लाभार्थ्यांच्या घरकुलांना मंजुरी दिली आहे.




याच प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत २० लक्ष लाभार्थ्यांना मंजुरी पत्र वितरण व त्यापैकी १० लक्ष लाभार्थ्यांना प्रथम हप्ता वितरण कार्यक्रम दिनांक २२ फेब्रुवारी, २०२५ रोजी बॅडमिंटन हॉल, श्री.शिवछत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे, बालेवाडी, पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. यावेळी मा.केंद्रीय मंत्री, गृह व सहकार मंत्रालय, भारत सरकार श्री.अमित शाह यांच्या शुभहस्ते व मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली तसेच मा.उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री.एकनाथ शिंदे व मा.उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री.अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत २० लाख घरकुल मंजुर लाभार्थ्यांपैकी पुणे जिल्ह्यातील पाच घरकुल लाभार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरुपात मंजुरी पत्राचे वितरण करण्यात आले.



त्याचप्रमाणे मा.केंद्रीय मंत्री, गृह व सहकार मंत्रालय, भारत सरकार श्री.अमित शाह यांच्या शुभहस्ते प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत २० लाख घरकुल मंजुर लाभार्थ्यांपैकी १० लाख घरकुल लाभर्थ्यांना प्रथम हप्ता रक्कम रू.१५ हजार प्रती लाभार्थी याप्रमाणे एकूण रक्कम रू.१५०० कोटी इतका निधी एका क्लिकवर वितरण करण्यात आला. ही अनुदानाची रक्कम थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात आली.



यावेळी मा.केंद्रीय राज्यमंत्री, सहकार व नागरी विमान वाहतूक मंत्रालय, भारत सरकार श्री.मुरलीधर मोहोळ, मा.सभापती, महाराष्ट्र विधान परिषद प्रा.राम शिंदे, मा.मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण, संसदीय कार्य श्री.चंद्रकांत पाटील, मा.मंत्री, क्रीडा व युवक कल्याण श्री.दत्तात्रय भरणे, मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज श्री.जयकुमार गोरे, मा.उपसभापती, महाराष्ट्र विधान परिषद, डॉ.निलम गोऱ्हे, मा.राज्यमंत्री, ग्राम विकास व पंचायत राज, श्री.योगेश कदम, मा.राज्यमंत्री, नगर विकास व सामाजिक न्याय श्रीमती माधुरी मिसाळ, मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन श्रीमती सुजाता सौनिक, मा.प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग श्री.एकनाथ डवले, मा.विभागीय आयुक्त, पुणे विभाग श्री.चंद्रकांत पुलकुंडवार, मा.संचालक, ग्रामीण गृहनिर्माण, डॉ.राजाराम दिघे, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे श्री.गजानन पाटील व इतर मान्यवर उपस्थित होते.




या कार्यक्रमाकरीता पुणे जिल्ह्यातील प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत निवडक घरकुल मंजुर लाभार्थी श्री.शंकर व श्रीमती निर्मला शंकर तोतरे, कुरवंडी, तालुका आंबेगाव, श्री.शरद व श्रीमती कमल शरद भारती, मेखळी, तालुका बारामती, श्री.विराज राजेंद्र पाटोळे, नानविज, तालुका दौंड, श्री.सोमनाथ व श्रीमती सुवर्णा सोमनाथ ठाकर, परंदवाडी, तालुका मावळ, श्री.भागचंद व श्रीमती उज्ज्वला भागचंद कोळपे, करंडेलवाडी, तालुका शिरुर यांच्यासह राज्यातील इतर जिल्ह्यांचे ५ हजार घरकुल लाभार्थी उपस्थित होते.

तसेच या कार्यक्रमाकरीता जिल्हास्तरावर मा.पालकमंत्री, मा.खासदार, मा.आमदार, जिल्हा परिषद अध्यक्ष, जिल्हास्तरावरील सर्व पदाधिकारी व संबंधित अधिकारी, तालुकास्तरावर पंचायत समितीचे सभापती, तालुकास्तरावरील सर्व पदाधिकारी व संबंधित अधिकारी, ग्रामस्तरावर ग्रामपंचायतीचे सरपंच, लाभार्थी, ग्रामस्थ व ग्रामस्तरावरील सर्व पदाधिकारी, संबंधित अधिकारी व कर्मचारी दूरदृष्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

यावेळी जिल्हा, तालुका व ग्रामस्तरावर मान्यवरांच्या हस्ते प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ च्या लाभार्थ्यांना मंजुरी पत्र वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाची सुरूवात दीपप्रज्वलनाने करण्यात आली. मा.केंद्रीय मंत्री, गृह व सहकार मंत्रालय, भारत सरकार श्री.अमित शाह यांचे स्वागत मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री.देवेंद्र फडणवीस व मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज श्री.जयकुमार गोरे यांनी बैलगाडीची प्रतिकृती भेट देवून केले. मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री.देवेंद्र फडणवीस यांचे स्वागत मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज श्री.जयकुमार गोरे यांनी पुष्पगुच्छ देवून केले. तसेच मा.उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री.एकनाथ शिंदे व मा.उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री.अजित पवार यांचे स्वागत मा.राज्यमंत्री, ग्राम विकास व पंचायत राज, श्री.योगेश कदम यांनी पुष्पगुच्छ देवून केले. त्याचप्रमाणे मंचावर उपस्थित इतर मान्यवरांचे स्वागत मा.प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, श्री.एकनाथ डवले यांनी पुष्पगुच्छ देवून केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज श्री.जयकुमार गोरे यांनी मांडले. त्यानंतर मान्यवरांच्या शुभहस्ते महा आवास अभियान पुस्तिका, महा आवास अभियान पोस्टर व लाभार्थ्यांना घरकुल मंजुरी पत्र वितरण करण्यात आले. या कार्यक्रमाविषयी मा.उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री.अजित पवार, मा.उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री.एकनाथ शिंदे, मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री.देवेंद्र फडणवीस व मा.केंद्रीय मंत्री, गृह व सहकार मंत्रालय, भारत सरकार श्री.अमित शाह यांनी भाषणातून आपले मत मांडले. या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन मा.प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, श्री.एकनाथ डवले यांनी केले.





## ग्राम विकास विभागाने १०० दिवसांचे घरकुलाचे उद्दिष्ट ४५ दिवसातचं पूर्ण केले

### - मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज, श्री. जयकुमार गोरे

प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत २० लाख लाभार्थ्यांना मंजुरी पत्र वितरण व १० लाख लाभार्थ्यांना पहिला हप्ता वितरण कार्यक्रमाप्रसंगी मा. मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज श्री.जयकुमार गोरे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक सादर करतांना सांगितले की,महाराष्ट्राच्या किंबहुना देशाच्या इतिहासामध्ये एका वेळी २० लाख घरांचे मंजुरी पत्र आणि त्यापैकी १० लाख ३४ हजार लाभार्थ्यांना पहिला हप्ता वितरित करण्याचा ऐतिहासिक दिवस आहे. देशाचे आदरणीय पंतप्रधान मोदीजींनी जो घरे देण्याचा संकल्प केलेला आहे, तोच संकल्प पुढे घेऊन महाराष्ट्र वाटचाल करीत आहे.

देशातल्या इतिहासात एका राज्याला एवढे मोठे उद्दिष्ट आजपर्यंत कधी मिळालं नव्हतं. मला सांगताना आनंद होतो आहे की आज प्रधानमंत्री आवास योजनेच्या २० लाख लाभार्थ्यांचा मंजुरी पत्र प्रदान करण्याचा कार्यक्रम सर्व जिल्हा परिषदेमध्ये पालकमंत्री महोदयांच्या हस्ते, पंचायत समितीमध्ये आमदार महोदयांच्या उपस्थित आणि २८ हजार ग्रामपंचायतीमध्ये लोकप्रतिनिधींच्या हस्ते सगळ्या लाभार्थ्यांचा मंजुरी पत्र प्रदान करून सन्मानित करण्यात येत आहे.

ग्राम विकास खात्यासाठी १०० दिवसांमध्ये जे उद्दिष्ट पूर्ण करायचं होतं, ते आमच्या खात्यानं ४५ दिवसात पूर्ण केलं. दुसरे एक आव्हान मुख्यमंत्री महोदयांनी आठ दिवसापूर्वी दिले ते म्हणजे जर १० लाख लाभार्थ्यांच्या खात्यावर पैसे पाठवाल तर मी अमित भैय्यांना कार्यक्रमासाठी आणतो. आज मला आनंद आहे, आपण साडेदहा लाख घरांचा पहिला हप्ता या ठिकाणी देतो आहे.

भुमिहीन लाभार्थ्यांना जागा देण्यासाठी पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेतून जागा खरेदीसाठी ५० हजार रुपये अनुदानाची रक्कम वाढवून १ लाख रुपये रक्कम देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासोबतच गावठाणाची जागा उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतलेला आहे. ग्राम विकास खात्यानं ज्या वेगाने काम केलं त्यासाठी आमचे राज्यमंत्री आणि सचिव आम्ही सगळ्यांनी मिळून राज्यात विभागीय बैठका घेतल्या आणि हे यश साध्य केलं. असेच यश आमचं खातं १०० दिवसीय कार्यक्रमात मिळवणार याची मला खात्री आहे. पुन्हा एकदा आपल्या सगळ्या लाभार्थ्यांना नवीन घरासाठी मनापासून शुभेच्छा !



## महाराष्ट्र राज्यात अनेक क्षेत्रांसह गृहनिर्माण क्षेत्राचा विकास अधिक वेगाने सुरू

### - मा.उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, श्री. अजित पवार

प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत २० लाख लाभार्थ्यांना मंजुरी पत्र वितरण व १० लाख लाभार्थ्यांना पहिला हप्ता वितरण कार्यक्रमाप्रसंगी मा. उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री.अजित पवार यांनी आपल्या भाषणात सांगितले की, शेती, उद्योग, शिक्षण, व्यापार, सहकार, आरोग्य व गृहनिर्माण अशा अनेक क्षेत्रात महाराष्ट्राचा विकास वेगाने सुरू आहे.

गेल्या ३५ वर्षाच्या राजकीय जीवनामध्ये मी एवढ्या मोठ्या घटकाला २० लाख लाभार्थ्यांना मंजुरी पत्र आणि दहा लाख लाभार्थ्यांना प्रथम हप्ता वितरण एकाच वेळी मिळतंय, हे पहिल्यांदाच अनुभवतो आहे. घर प्रत्येकाच्या आयुष्यामध्ये स्वप्न असतं, आपलं स्वतःचं चांगलं घर, मुलाबाळांचं चांगलं शिक्षण, चांगला संसार आणि ते स्वप्न पूर्ण करण्याची जबाबदारी मोदीजींनी स्वीकारल्यानंतर संपूर्ण देशामध्ये २ कोटी घरकुल देण्याचा निर्णय घेतला.

ग्रामविकास व पंचायत राज विभागाच्या माध्यमातून घरकुलांना मंजुरी, हप्ता वितरण, घरकुले पूर्ण करणे आणि जागेची उपलब्धता अशी कामे प्राधान्याने करतोय.राज्यात गतीने घरकुल निर्मितीसाठी दिनांक १ जानेवारी ते १० एप्रिल २०२५ या १०० दिवसांच्या कालावधीमध्ये 'महा आवास अभियान' राबवित असून ठरवलेलं उद्दिष्ट वेळेआधीच पूर्ण होईल, याची मला खात्री आहे. नवीन घरांसाठी सर्वांना शुभेच्छा!



## या कार्यक्रमामुळे लाखो परिवारांचे हक्काच्या 'स्विट होम' चे स्वप्न पूर्ण होणार

### - मा.उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, श्री. एकनाथ शिंदे



प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत २० लाख लाभार्थ्यांना मंजुरी पत्र वितरण व १० लाख लाभार्थ्यांना पहिला हप्ता वितरण कार्यक्रमाप्रसंगी मा. उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री. एकनाथ शिंदे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, १० लाख लाभार्थ्यांना त्यांच्या हक्काचं घर बांधण्यासाठी पहिला हप्ता वितरण सोहळा आज संपन्न होत आहे. यामुळे लाखो परिवारांचे हक्काच्या 'स्वीट होम' चे स्वप्न पूर्ण होणार आहे.

सर्वसामान्य माणसाला घर मिळाले पाहिजे, यासाठी मोदीजींनी तिसऱ्यांदा पंतप्रधान पदाची शपथ घेतल्यानंतर कॅबिनेटच्या पहिल्या बैठकीत ३ कोटी घर बांधण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या संकल्पपूर्तीसाठी या कार्यक्रमाद्वारे २० लाख कुटुंबाला घर मिळणार आहे.

महाराष्ट्रात हाऊसिंग कॉलनी व इको फ्रेंडली घरांची निर्मिती आपण करतोय, म्हणूनचं लोकं आपल्याकडे घरे मागतात. मानवाची महत्त्वाची गरज मकान म्हणजे घर अशा कार्यक्रमातून ग्राम विकास विभाग लाखो लोकांचे घरांचे स्वप्न पूर्ण करतं आहे. त्याकरीता मी त्यांना व घराचा लाभ मिळाल्याबद्दल सर्व लाभार्थ्यांचे अभिनंदन करतो!

## घरकुल अनुदानात वाढ, लाभार्थ्यांना मिळणार दोन लाखांपेक्षा जास्त रक्कम

### - मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, श्री. देवेंद्र फडणवीस



प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत २० लाख लाभार्थ्यांना मंजुरी पत्र वितरण व १० लाख लाभार्थ्यांना पहिला हप्ता वितरण कार्यक्रमाप्रसंगी मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री. देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या भाषणात सांगितले की, मा.अमित शाहजी यांनी १० लाख लाभार्थ्यांच्या खात्यांमध्ये पैसा जमा करायला बटन दाबले आणि लोकांच्या खात्यामध्ये प्रत्यक्षात पैसे देखील जमा झाले आहेत.

केंद्रीय ग्रामविकास मंत्री, श्री. शिवराज सिंग चव्हाण साहेबांनी पुण्यामध्ये मला २० लाख घरांच्या उद्दिष्टाचे पत्र दिले होते आणि आज केवळ ४५ दिवसांमध्ये याच पुण्यामध्ये ग्रामविकास विभागाने २० लाख घरांची मंजुरीचे पत्र आणि १० लाखांच्या खात्यामध्ये प्रत्यक्ष पैसे दिले आहे. घरांसाठी १ लाख २० हजार रुपये, नरेगा, शौचालय या माध्यमातून जवळपास १ लाख ६० हजार रुपये मिळायचे. यामध्ये ५० हजार रुपयांची वाढ केल्यामुळे आता दोन लाख रुपयांच्या वर अनुदान मिळणार आहे.

राज्यात विविध घरकुल योजनाद्वारे १ लाख कोटी रुपये गुंतवणूक आपण केवळ सामान्य माणसाला घर देण्याकरीता करतो आहोत. घर जसं घरातल्या पुरुषाच्या नावावर असेल तसंच आमच्या भगिनीचंही नाव घराला असलंच पाहिजे. ५ ब्रास पर्यंत वाळू मोफत देण्याचा निर्णय आपण यापूर्वी घेतलेला आहे. आज महाराष्ट्रात संपन्न होत असलेल्या ऐतिहासिक कार्यक्रमाच्या निमित्ताने मी आपल्या सर्वांना मनापासून शुभेच्छा देतो!

## भुमिहीन लाभार्थ्यांना १ लाख रूपये अर्थसहाय्य महाराष्ट्रात उल्लेखनीय कामगिरी

### - मा.केंद्रीय मंत्री, गृह व सहकार मंत्रालय, भारत सरकार, श्री. अमित शाह



मा. केंद्रीय मंत्री, गृह व सहकार मंत्रालय, भारत सरकार श्री. अमित शाह यांनी त्यांच्या भाषणात सांगितले की, २० लाख घरकुलांना एकाच वेळी मंजुरी देण्याचा देशातील हा पहिला प्रसंग आहे. एवढेच नाही तर कार्यक्रम संपण्याच्या आत १० लाख लाभार्थ्यांच्या खात्यात पहिला हप्ता जमा करण्याचे इतके मोठे काम महाराष्ट्र सरकारने केले आहे. २० लाख लोकांचे घराचे स्वप्न आज केंद्र व राज्य सरकार मिळून पूर्ण करीत आहे. या २० लाख लोकांना स्वतःच्या घरासोबतच शौचालय, सोलर पॅनल व गॅस कनेक्शनही महाराष्ट्र सरकार देत आहे.

प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ मध्ये महाराष्ट्र राज्याला सर्वात जास्त घरे दिली असून ही महाराष्ट्रासाठी गौरवाची बाब आहे. घरासाठी निधी दिला जातो परंतु भुमिहीन लाभार्थ्यांना १ लाख रूपये देण्याची उल्लेखनीय कामगिरी महाराष्ट्र सरकार करीत आहे. यासाठी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचे अभिनंदन!

येणारी दिवाळी हे सर्व २० लाख लाभार्थी त्यांच्या स्वतःच्या घरात साजरी करतील, याचा मला पूर्ण विश्वास असून आपल्याला मिळालेल्या घरासाठी सर्वांना शुभेच्छा!

# गतिमानता व गुणत्तेसाठी महा आवास अभियान २०२४-२५

'सर्वांसाठी घरे - २०२४' या शासनाच्या धोरणांतर्गत विविध उपक्रम राबवून केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण, प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान व राज्य पुरस्कृत रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, पारधी आवास योजना, आदिम आवास योजना, अटल बांधकाम कामगार आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजना, मोदी आवास घरकुल योजना या सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या कामास गतिमान करणे व गुणवत्ता आणणे यासाठी राज्यात दरवर्षी दिनांक २० नोव्हेंबर रोजीच्या राष्ट्रीय आवास दिनाचे औचित्य साधून 'महा आवास अभियान' राबविण्यात येते.

राज्यात नवीन सरकारची स्थापना झाल्यानंतर मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या १०० दिवसीय कार्यक्रमामध्ये अभियान राबविण्याचा उपक्रम समाविष्ट असल्याने सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या कामास गतिमान करणे व गुणवत्ता वाढीसाठी महाराष्ट्र राज्यात **दिनांक ०१ जानेवारी, २०२५ ते दिनांक १० एप्रिल, २०२५ या १०० दिवसांच्या कालावधीत "महा आवास अभियान २०२४-२५"** राबविण्यात येत आहे.

**"महा आवास अभियान २०२४-२५"** अंतर्गत राज्यात **दिनांक ०१ जानेवारी, २०२५ ते दिनांक १० एप्रिल, २०२५ या १०० दिवसांच्या कालावधीत राबविण्यात येत असलेले उपक्रम पुढीलप्रमाणे आहेत.**

## भूमीहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देणे

सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत गरजू, पात्र परंतु घरकुल बांधकामासाठी जागा उपलब्ध नसलेल्या लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देण्यासाठी **पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना**, शासकीय जागा विनामूल्य उपलब्ध करण्याची योजना, ग्रामीण भागातील अतिक्रमणे नियमानुकूल करण्याची योजना व इतर मार्ग – उदा. बक्षीसपत्र, संमतीपत्र, भाडेपट्टा, इ. प्रभावीपणे राबवून भूमिहीन लाभार्थ्यांना जागेची उपलब्धता करून देण्यात येत आहे.

## घरकुलांना उद्दिष्टांप्रमाणे मंजूरी देणे

केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण, प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान व राज्य पुरस्कृत या सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत जिल्ह्यांना वितरीत करण्यात आलेल्या घरकुल उद्दिष्टांनुसार मंजूरी देण्यात आली. लाभार्थ्यांच्या सक्रिय सहभागासाठी लाभार्थी मेळाव्याचे आयोजन करून लाभार्थ्यांना **घरकुल मंजूरीचे पत्र** त्वरित वितरित करणे, घरकुल बांधकामाबाबत तांत्रिक मार्गदर्शन करणे व भूमिपूजन कार्यक्रम आयोजित करुन **घरकुलाचे बांधकाम सुरु करण्यात आले**.

## मंजूर घरकुलांना हप्ते वेळेत वितरित करणे

केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण, प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान व राज्य पुरस्कृत या सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत मंजूर घरकुलांना तात्काळ **पहिल्या हप्त्याचे वितरण करून** पुढील हप्ते घरकुलांच्या भौतिक प्रगतीनुसार विनाविलंब वितरित करण्यात येत आहे. लाभार्थ्यांच्या सक्रिय सहभागासाठी स्थानिक स्तरावर **हप्ते वितरण कार्यक्रमाचे आयोजित करण्यात येत आहे**.

## मंजूर घरकुले भौतिकदृष्ट्या पूर्ण करणे

केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण, प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान व राज्य पुरस्कृत या सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत मंजूर घरकुलांची कामे भौतिकदृष्ट्या पूर्ण करण्यात येत आहे. यामध्ये लाभार्थ्यांच्या सक्रिय सहभागासाठी त्यांच्या बैठका/ मेळावे घेणे, सरपंच, ग्रामपंचायत अधिकारी (ग्रामसेवक/ ग्राम विकास अधिकारी), ग्रामपंचायत कर्मचारी, महिला स्वयंसहाय्यता गट, अंगणवाडी कर्मचारी, आशा कर्मचारी, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, इ. यांनी घरकुलांना वेळोवेळी भेटी देवून मंजूर केलेली सर्व घरकुले गतीने व गुणवत्तापूर्वक पूर्ण करणेकामी सक्रीय सहभाग घेत आहेत.

## प्रलंबित घरकुले (Delayed Houses) पूर्ण करणे

प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण अंतर्गत घरकुलांना पहिला हप्ता प्रदान केल्यापासून १२ महिन्यांपेक्षा जास्त कालावधी झालेली, मात्र अद्यापपर्यंत अपूर्ण असलेली प्रलंबित घरकुले (Delayed Houses) प्राधान्याने पूर्ण कररण्यात आली. यासाठी प्रलंबित घरकुलांच्या यादीनुसार घरकुले प्रलंबित राहण्यामागची कारणे शोधून त्या **कारणांचे विश्लेषण व उपाययोजना करून सदर घरकुले पूर्ण करणे**कामी गरजेप्रमाणे तालुका कायदेविषयक सहाय्य व सल्ला समितीच्या सहाय्याने



**'लोक अदालत'** वा इतर मार्गाने लाभार्थ्यांना घरकुल पूर्ण करण्यासाठी प्रवृत्त करण्यात आले. तसेच पूर्ण होऊ न शकणारी प्रलंबित घरकुले प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीणच्या मार्गदर्शक सूचनांनुसार Refund करुन Remand करून **यापुढे प्रलंबित घरकुलांच्या यादीमध्ये नवीन घरकुलांचा समावेश होणार नाही याची दक्षता घेण्यात येत आहे.**

## ग्रामीण गवंडी प्रशिक्षण पूर्ण करणे

घरकुलांची दर्जेदार बांधकामासाठी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत ग्रामीण गवंडी प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्दिष्ट हे प्रशिक्षण देणाऱ्या संस्था (Training Provider) यांच्याशी समन्वय ठेवून गवंडी प्रशिक्षण मूल्यमापनासह (Assessment) **पूर्ण केली.** तसेच प्रशिक्षित ग्रामीण गवंडी व ग्रामपंचायत क्षेत्रातील इतर उपलब्ध गवंडी यांची ग्रामपंचायतनिहाय पॅनेल तयार करून या **पॅनेलमधील गवंड्यांचा ग्रामीण गृहनिर्माण योजनांमधील घरकुलांच्या बांधकामात सहभाग घेत आहे.**

## बहुमजली इमारती, हाऊसिंग कॉलनी व हाऊसिंग अपार्टमेंटची उभारणी करणे

जागांची कमतरता व जागांच्या किमती यांचा विचार करून कमी जागेत जास्त लाभार्थी सामावण्यासाठी लाभार्थ्यांना मार्गदर्शन करून, त्यांच्या एकत्रित निधीतून जागा खरेदी करून बहुमजली इमारती, गृहसंकुले व हाऊसिंग अपार्टमेंट उभारण्यात येत आहे.

## डेमो हाऊसचा प्रभावी वापर करणे

घरकुलांची गुणवत्ता सुधारण्यासाठी व लाभार्थ्यांना मार्गदर्शक ठरण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत तालुका व जिल्हा स्तरावर डेमो हाऊसची निर्मिती करण्यात आली आहे. सदर डेमो हाऊसेसला लाभार्थ्यांच्या प्रत्यक्ष भेटी आयोजित करुन ग्रामपंचायत स्तरावरील डेमो हाऊस मॉडेल लाभार्थ्यांस वेळोवेळी दाखवून त्याप्रमाणे त्यांच्या घरकुलांची कामे पूर्ण होण्यासाठी प्रभावीपणे वापर होत आहे. या व्यतिरिक्त प्रत्येक डेमो हाऊसमध्ये माहिती कक्ष किंवा **लाभार्थी / महिला स्वयं सहायता गट यांच्या उत्पादनांच्या विक्रीसाठी महिला स्वयंसहायता गट/ ग्रामसंघ/ प्रभाग संघ/ विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था/ शेतकरी उत्पादक कंपनी, इ. समुदाय आधारीत संस्थांच्या सहकार्यातून कॉप-शॉप (Co-op Shop) सुरु करण्यात येत आहे.**

## शासकीय योजनांशी कृतीसंगम (Convergence) करणे

सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या लाभार्थ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी शासनाच्या विविध योजनांशी कृतीसंगम करून लाभार्थ्यांना **महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने मधून मनुष्य दिवस रोजगार, स्वच्छ भारत मिशन(ग्रा) मधून शौचालय, जल जीवन मिशन मधून** नळाने पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, **प्रधानमंत्री उज्ज्वला योजने मधून** गॅस जोडणी, **सौभाग्य योजने मधून** विद्युत जोडणी, **राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती मिशन मधून** उपजिविकेच्या साधनांची उपलब्ध**ता**, इ. लाभ देण्यात येत आहे.

तसेच **दलित वस्ती सुधार योजना, ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजना, महाऊर्जा जिल्हा परिषद सेस, पंचायत समिती सेस, ग्राम पंचायत सेस, सीएसआर निधी** इ. च्या माध्यमातून लाभार्थ्यांची घरकुले, बहुमजली इमारती, हाऊसिंग कॉलनी, हाऊसिंग अपार्टमेंट यांना **मूलभूत नागरी सुविधा जसे जोडरस्ते, अंतर्गत रस्ते, ड्रेनेज सिस्टीम, पथदिवे,** इ.ची उपलब्धता करण्यात येते.

## नावीन्यपूर्ण उपक्रम (Innovations / Best Practices) राबविणे

ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या अंमलबजावणीमध्ये गतिमानता व गुणवत्ता आणण्यासाठी राबविण्यात आलेले नावीन्यपूर्ण उपक्रम

**१.लॅण्ड बँक :-** सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांमधील भूमिहीन लाभार्थ्यांना घरकुल बांधकामाकरीता जागा उपलब्ध करुन देण्यासाठी ग्रामपंचायत स्तरावर विविध मार्गांनी उपलब्ध होणाऱ्या जागांची **'लॅण्ड बँक'** तयार करण्यात येत आहे.

**२.सॅण्ड बँक :-** सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांमधील लाभार्थ्यांना घरकुल बांधकामाकरीता वाळू उपलब्ध करुन देण्यासाठी प्रत्येक जिल्हा परिषद गटात किमान एक याप्रमाणे **'सॅण्ड बँक'** ची निर्मिती येत आहे.

**३.घरकुल मार्ट :-** राज्यात महिला स्वयंसहायता गट/ग्राम संघ/ प्रभाग संघ/ विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था/शेतकरी उत्पादक कंपनी, इ. समुदाय आधारीत संस्थाद्वारे **'घरकुल मार्ट'** सुरू करून त्याद्वारे घरकुलाचे बांधकाम साहित्य जसे – दगड, विटा, वाळू, सिमेंट, दारे, खिडक्या, छताचे साहित्य, इ. विक्रीसाठी उपलब्ध करण्यात येत आहे.

**३ . गृहकर्ज :-** घरकुलांचे बांधकामजलद गतीने पूर्ण करण्यासाठी वित्तीय संस्थांच्या समन्वयातून गरजेप्रमाणे - लाभार्थ्यांना **गृहकर्ज** मिळवून देण्यासाठी आवश्यक सहाय्य करण्यात येत आहे.



**४.वाळूला पर्याय :-** क्रश सॅण्ड, सिमेंट ब्लॉक, फ्लाय ॲश ब्रिक्स, इंटर लॉकींग ब्रिक्स, हॉलो ब्रिक्स, इ. साहित्याचा वापर **वाळूला पर्याय** म्हणून करण्यात येत आहे.

**५. मॉडेल हाऊसेस :-** किमान १० % घरकुल बांधकामामध्ये फरशी/ लादी, रंगरंगोटी, किचन गार्डन/परसबाग, रेन वॉटर हार्वेस्टींग, सौरउर्जा साधने व नेट बिलींग, इ. चा वापर करून '**मॉडेल हाऊसेस**' उभारण्यात येत आहे. रंगरंगोटी करतांना शासनाचे पत्र क्र.जा.क्र.राव्यक-ग्रागृ/बांध/१४०/२०२१, दिनांक १८ मे, २०२१ रोजीच्या पत्रानुसार घरकुलांना रंगसंगती केली.

**६. नवनवीन तंत्रज्ञान :-** किमान १० % घरकुल बांधकामासाठी स्थानिक बांधकाम साहित्य, नवनवीन बांधकाम तंत्रज्ञान, किफायतशीर बांधकाम तंत्रज्ञान, नैसर्गिक आपत्ती रोधक तंत्रज्ञान, इ. **नवनवीन तंत्रज्ञानाचा** वापर करण्यात येत आहे.

७. घरावर ग्रामीण गृहनिर्माण **योजनेचा लोगो, पती पत्नीचे नाव व ग्रामपंचायतीच्या मालमत्ता नोंदवही मध्ये घरकुलाची नोंद** इ. बाबींची पूर्तता करण्यात येत आहे.

**८.क्षेत्र अधिकारी ॲप :-** ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांनी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण ची प्रभावी अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापनासाठी **क्षेत्र अधिकारी ॲप** (Area Officer App) ची निर्मिती केली आहे. ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या कामाची पाहणी करतांना क्षेत्र अधिकारी या ॲपचा वापर करीत आहेत.

**९. इतर नावीण्यपूर्ण उपक्रम राबविणे :-**

### अभियान अंमलबजावणीसाठी क्षमताबांधणी कार्यक्रम

"**महा आवास अभियान २०२४-२५**" च्या प्रभावी अंमलबजावणी व भागधारकांच्या क्षमता बांधणीसाठी राज्यस्तरीय अभियान शुभारंभ कार्यशाळेसह राज्यात **विभागस्तरीय कार्यशाळा, जिल्हास्तरीय कार्यशाळा, तालुकास्तरीय कार्यशाळा व ग्रामस्तरीय कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळांमध्ये अभियाना विषयी सखोल मार्गदर्शन करण्यात आले. त्याचप्रमाणे या कार्यशाळांच्या माध्यमातून अभियान यशस्वीतेसाठी उपाययोजना व नियोजन करण्यात आले.**

### ग्राम कृती गटाचे (Village Action Group) गठन

ग्रामस्तरीय कार्यशाळेमध्ये प्रत्येक ग्रामपंचायती मध्ये 'ग्राम कृती गटाचे गठन' करण्यात आले. यामध्ये गावातील प्रभावी व्यक्ती, युवक/ युवती, इत्यादींचा समावेश करण्यात आला. उदा. सरपंच, ग्रामसेवक, पोलीस पाटील, शिक्षक, पोलीस इ. प्रभावी व्यक्ती. या गटाने "**महा आवास अभियान २०२४-२५**" मध्ये गावस्तरावर केल्या जाणाऱ्या व करावयाच्या प्रत्यक्ष उपाय योजनांचा पाठपुरावा करुन अभियानाच्या यशस्वीतेसाठी सर्वोत्तोपरी प्रयत्न केले.

### लाभार्थी मेळावे

गावोगावी लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत वेळोवेळी लाभार्थ्यांचे मेळावे आयोजित करुन लाभार्थ्यांना घरकुल बांधकाम व दर्जाबाबत मार्गदर्शन करून प्रोत्साहन दिले. तसेच लाभार्थ्यांना घरकुल मंजूरी पत्र वितरण, घरकुलाचे भूमिपूजन कार्यक्रम, घरकुलांचे हप्ते वितरण कार्यक्रम, गृहप्रवेश कार्यक्रम, इ. सारखे उपक्रम राबविणेत आलेत.

### वित्तीय मेळावे

तालुकास्तरावर/ गावोगावी वित्तीय संस्थांच्या अधिकाऱ्यांच्या/कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत घरांसाठी कर्ज घेवू इच्छिणाऱ्या लाभार्थ्यांसाठी वित्तीय संस्था मेळाव्याचे आयोजन करुन लाभार्थ्यांना घरकुल बांधण्यासाठी कर्ज उपलब्धतेसाठी प्रयत्न करण्यात आलेत.

### अभियानाच्या प्रचार व प्रसिध्दीसाठी माहिती, शिक्षण व संवाद (IEC) कार्यक्रम

'महा आवास अभियान २०२४-२५' अंतर्गत राज्यात राबविण्यात येणाऱ्या विविध घरकुल योजनांबाबत जन जागृती, प्रचार-प्रसिध्दी करण्यासाठी माहिती, शिक्षण व संवाद (IEC) च्या विविध उपक्रमांचा जसे- Mass मिडीया, Outdoor मिडीया, Social मिडीया, Group मिडीया, आंतरव्यक्ती संवाद (IPC), पारंपारीक मिडीया, इ. उपक्रमांचा यथोचीत वापर करण्यात आला.

### अभियानाची प्रभावी अंमलबजावणी, सनियंत्रण व मूल्यमापन

**"महा आवास अभियान २०२४-२५"** च्या प्रभावी अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापनासाठी राज्य, विभाग, जिल्हा, तालुका व गाव स्तरावर समित्या कार्यरत राहतील. या सर्व स्तरावरील अंमलबजावणी,संनियंत्रण व मूल्यमापन समित्या राज्यस्तर, विभागस्तर, जिल्हास्तर, तालुकास्तर व गावपातळीवरुन क्षमता बांधणी कार्यशाळा, आढावा बैठका, क्षेत्रिय भेटी (Field Visits), Awaas Soft, MIS Formats, इ. द्वारे अभियानाचे सनियंत्रण व मूल्यमापन करीत आहेत.

### अभियान कालावधीतील उत्कृष्ट कार्याचा गौरव

अभियान कालावधीत उत्कृष्ट काम करणाऱ्या संस्था व व्यक्तींना '**महा आवास अभियान पुरस्कार २०२४-२५**' देऊन गौरविण्यात येईल.



## मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली 'सामाजिक क्षेत्र वॉररूम' मध्ये बैठक संपन्न

दिनांक ०३ फेब्रुवारी, २०२५ रोजी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली व मा. उप मुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत 'सामाजिक क्षेत्र वॉररूम', मंत्रालय, मुंबई येथे केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत आवास योजनांची आढावा बैठक संपन्न झाली.

या बैठकीला मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज श्री. जयकुमार गोरे, मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता श्री. गुलाबराव पाटील, मा.राज्यमंत्री, ग्राम विकास व पंचायत राज श्री. योगेश कदम, मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन श्रीमती सुजाता सौनिक, मा.प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग श्री.एकनाथ डवले व मा.संचालक, ग्रामीण गृहनिर्माण डॉ.राजाराम दिघे व इतर मान्यवर उपस्थित होते.

प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत महाराष्ट्र राज्यासाठी १९ लाख ६६ हजार घरकुलांचे उद्दिष्ट ठेवले असून यामध्ये आतापर्यंत १६ लाख ८१ हजार ५३१ घरकुलांना मंजुरी देण्यात आली आहे, असे सांगत मा.मुख्यमंत्री, देवेंद्र फडणवीस यांनी सामाजिक उत्तरदायित्व निधीची मदत घेऊन कामांना गती देण्याचे व घरकुलांचे उद्दिष्ट पूर्ण करण्याचे निर्देश दिले. तसेच भुमिहीन लाभार्थ्यांना तातडीने जागा उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हाधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी एकत्रितपणे उपाययोजना कराव्यात. तसेच गायरान जमिनींवरील आवास योजनांच्या अडचणी सोडवण्यासाठी विभागीय आयुक्तांनी विशेष लक्ष द्यावे. घरकुल योजनेतील अडचणी दूर करून कामांना गती द्यावी. "घरकुल मार्ट" ही संकल्पना अमलात आणून घरकुलांसाठी आवश्यक साहित्य सहज उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव तयार करावा. आवास योजनांसाठी वाळू उपलब्ध करण्यासंदर्भातील परिपत्रक पुनःनिर्गमित करण्यात यावे. महसूल विभागाने गावठाणासंदर्भात आवश्यक कार्यवाही करावी. तसेच ग्राम विकास विभागाच्या १०० दिवसांच्या कार्यक्रमाबाबत दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही करण्याबाबत मा. मुख्यमंत्री, श्री. देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले.



## 'महा आवास अभियान २०२४-२५' क्षमता बांधणी कार्यशाळा

सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या कामात गतिमानता व गुणवत्ता आणण्यासाठी दिनांक ०१ जानेवारी, २०२५ ते दिनांक १० एप्रिल, २०२५ या १०० दिवसांच्या कालावधीत राबविण्यात येत असलेल्या "महा आवास अभियान २०२४-२५" च्या प्रभावी अंमलबजावणी व भागधारकांच्या क्षमता बांधणीसाठी राज्यात विभागस्तरीय, जिल्हास्तरीय, तालुकास्तरीय व ग्रामस्तरीय क्षमता बांधणी कार्यशाळांचे आयोजन करण्यात येत आहे.

दिनांक १७ जानेवारी, २०२५ रोजी मा. मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज, श्री.जयकुमार गोरे यांच्या अध्यक्षतेखाली सातारा जिल्हा परिषदेच्या मैदानावर 'महा आवास अभियान २०२४-२५' जिल्हास्तरीय क्षमता बांधणी कार्यशाळा संपन्न झाली. याप्रसंगी स्व. अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष श्री.नरेंद्र पाटील, जिल्हाधिकारी श्री.संतोष पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती याशनी नागराजन, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक श्री.विश्वास सिद, इ. मान्यवर उपस्थित होते.

या कार्यशाळांमध्ये मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज, श्री.जयकुमार गोरे यांनी अभियाना विषयी सखोल मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे या कार्यशाळांच्या माध्यमातून अभियान यशस्वीतेसाठी उपाययोजना व नियोजन करण्याचे सबंधितांना सुचित केले. तसेच राज्य शासनाच्या १०० दिवसांचा कार्यक्रमाबाबत मार्गदर्शन केले.

यावेळी मा.मंत्री महोदयांच्या शुभहस्ते विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत सन २०२४-२०२५ मध्ये घरकुले पूर्ण झालेल्या लाभार्थ्यांना प्रातिनिधीक स्वरुपात घराची चावी देवून सन्मानित करण्यात आले.



## प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत लाभार्थी प्रशिक्षण

मा.केंद्रीय मंत्री, गृह व सहकार मंत्रालय, भारत सरकार श्री.अमित शाह यांच्या शुभहस्ते व मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली तसेच मा.उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री.एकनाथ शिंदे व मा.उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री.अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत २० लक्ष लाभार्थ्यांना मंजुरी पत्र वितरण व त्यापैकी १० लक्ष लाभार्थ्यांना प्रथम हप्ता वितरण कार्यक्रम दिनांक २२ फेब्रुवारी, २०२५ रोजी पुणे येथे संपन्न झाला.

या राज्यस्तरीय कार्यक्रमाच्या **दीड तास अगोदर** राज्यातील जिल्हा, तालुका व ग्रामपंचायतस्तरावर देखील लाभार्थ्यांना प्रशिक्षण व मंजूरी पत्र वितरण कार्यक्रमाचे आयोजन करण्याबाबत कळविण्यात आले होते.

प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत २० लाख घरकुल मंजुर लाभार्थ्यांपैकी ५ हजार घरकुल लाभार्थी या कार्यक्रमाकरीता प्रत्यक्षात उपस्थित होते. त्यानुषंगाने या सर्व लाभार्थ्यांच्या क्षमता बांधणीसाठी मा.संचालक, ग्रामीण गृहनिर्माण यांनी कार्यक्रमस्थळी लाभार्थी प्रशिक्षण घेतले.




## प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत प्रशिक्षकांचे प्रशिक्षण संपन्न

प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत Awaas+२०२४ Survey व Awaas+२०२४ Mobile App बाबत सर्व विभागीय प्रोग्रामर व सर्व जिल्हा प्रोग्रामर यांना Master Trainer म्हणून प्रशिक्षण देण्यासाठी दोन दिवसीय राज्यस्तरीय प्रशिक्षकांचे प्रशिक्षण (ToT) दिनांक ११ व १२ मार्च, २०२५ रोजी हॉटेल के स्टार, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई येथे आयोजित करण्यात आले होते.

या प्रशिक्षण कार्यक्रमाप्रसंगी मा.संचालक, ग्रामीण गृहनिर्माण डॉ.राजाराम दिघे, सहसंचालक(NIC), ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार श्री.अजय मोर, राज्य व्यवस्थापन कक्षाचे उपसंचालक नीलेश काळे, राज्य समन्वयक (I T ) श्री.राम आघाव, राज्य समन्वयक (M&E) डॉ.संघरत्न सोनवणे, राज्य माहिती, शिक्षण व संवाद तज्ञ श्री.दिनेश मोवळे, वास्तुविशारद श्री.परमेश्वर शेलार, राज्य समन्वयक (M I S ) श्री.मायकल एल्डन, राज्य समन्वयक (MIS) श्री. संघपाल चव्हाण यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या पहिल्या सत्रात दिनांक ११ मार्च, २०२५ रोजी मा.संचालक, ग्रामीण गृहनिर्माण डॉ.राजाराम दिघे यांनी या प्रशिक्षण कार्यक्रमाचे प्रास्ताविक सांगितले. तसेच मा.संचालकांनी प्रशिक्षणार्थींना या प्रशिक्षणाचे महत्व, Master Trainer यांची भुमिका व जबाबदारी, जिल्हास्तरीय ऑपरेटर, तालुकास्तरीय ऑपरेटर, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता व सर्वेक्षक ग्रामपंचायत अधिकारी (ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी) यांना द्यावयाच्या प्रशिक्षणाबाबतचे नियोजन, प्रशिक्षण कार्यपध्दती, कालबध्दता व क्षेत्रीय तांत्रिक अडचणी, इ. बाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

त्यानंतर सहसंचालक(NIC), ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार श्री.अजय मोर यांनी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-2 अंतर्गत Awaas+२०२४ Survey व Awaas+२०२४ Mobile App बाबत सादरीकरण व आवास योजनांमध्ये येणाऱ्या तांत्रिक अडचणीबाबत मार्गदर्शन केले.

दिनांक १२ मार्च, २०२५ रोजी प्रशिक्षणार्थींनी Master Trainer म्हणून क्षेत्रीय स्तरावर घेण्यात येणाऱ्या प्रशिक्षणाबाबत सादरीकरण केले. या सादरीकरणामध्ये क्षेत्रीय पातळीवर आयोजित करण्यात येणाऱ्या प्रशिक्षण कार्यक्रमाचे वेळापत्रक, प्रशिक्षणार्थी संख्या, प्रशिक्षण स्थळ, आवश्यक साहित्य व सुविधा, इ. बाबींचा समावेश करण्यात आला. प्रशिक्षक व प्रशिक्षणार्थी यांचे प्रशिक्षणाबाबत अभिप्राय घेवून राज्यस्तरीय प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न झाला.



## मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज यांच्या अध्यक्षतेखाली विभागनिहाय बैठका

महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील गरीबांसाठी १९ लाख ६६ हजार घरकुलांचे उद्दिष्ट मिळाले असून या उद्दिष्टपूर्तीसाठी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री.देवेंद्र फडणवीस यांनी १०० दिवसांचा विशेष कार्यक्रम व मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज श्री.जयकुमार गोरे यांनी दिनांक ०१ जानेवारी, २०२५ ते दिनांक १० एप्रिल, २०२५ या १०० दिवसांच्या कालावधीत 'महा आवास अभियान २०२४-२५' राबविण्याचा निर्णय घेतला.

या १०० दिवसीय कार्यक्रमामध्ये २० लक्ष घरकुलांना मंजुरी व १० लक्ष लाभार्थ्यांना पहिला हप्ता वितरीत करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले. या उद्दिष्टपूर्तीसाठी मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज श्री.जयकुमार गोरे यांनी दिनांक २० जानेवारी, २०२५ रोजी पुणे विभाग, कोकण, दिनांक २८ जानेवारी, २०२५ रोजी नाशिक विभाग, दिनांक ०६ फेब्रुवारी, २०२५ रोजी अमरावती व नागपूर विभाग, दिनांक ०८ फेब्रुवारी, २०२५ रोजी औरंगाबाद विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांच्या आढावा बैठका घेतल्या.

या बैठकांना मा.मंत्री महोदयांसमवेत मा.राज्यमंत्री, ग्राम विकास व पंचायत राज श्री.योगेश कदम, मा.प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग श्री.एकनाथ डवले व मा.संचालक, ग्रामीण गृहनिर्माण डॉ.राजाराम दिघे उपस्थित होते.

या बैठकांमध्ये मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज श्री.जयकुमार गोरे यांनी भुमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करणे, घरकुलांना मंजुरी देणे, मंजुर घरकुलांना पहिला हप्ता तात्काळ वितरीत करणे, बांधकामाच्या प्रगतीनुसार सर्व हप्ते विनाविलंब वितरीत करणे व घरकुल बांधकामासंबंधित अडचणी दूर करणे अशा सुचना अधिकाऱ्यांना दिल्या.





## मा.संचालक, ग्रामीण गृहनिर्माण यांच्याकडून गृहनिर्माण योजनांच्या कामाची पाहणी

राज्यात राबविण्यात येणाऱ्या 'महा आवास अभियान २०२४-२५' च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी व घरकुलांची गुणवत्ता तपासणीकरीता मा.संचालक, ग्रामीण गृहनिर्माण यांनी सातारा, सांगली, नाशिक व अहिल्यानगर जिल्ह्यातील पंचायत समिती व ग्रामपंचायतींना क्षेत्रीय भेटी देवून विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या कामांची पाहणी केली. तसेच घरकुल लाभार्थ्यांना मार्गदर्शन केले.

मा.संचालक, ग्रामीण गृहनिर्माण डॉ.राजाराम दिघे यांनी दिनांक ०३ जानेवारी, २०२५ रोजी सातारा तालुक्यातील शेंद्रे लिंब आंबळे येथील गृहसंकुलास भेट देवून लाभार्थ्यांशी चर्चा केली.

दिनांक ०२ फेब्रुवारी, २०२५ रोजी सांगली जिल्ह्यातील पंचायत समिती कवठेमहांकाळ येथे भेट देवून गट विकास अधिकारी व इतर संबंधितांशी चर्चा केली. तसेच त्याच तालुक्यातील ग्रामपंचायत नागोळे येथील घरकुल बांधकामाची तपासणी करून लाभार्थ्यांना मार्गदर्शन केले.

दिनांक ०७ फेब्रुवारी, २०२५ रोजी नाशिक जिल्ह्यातील सिन्नर व अहिल्यानगर जिल्ह्यातील राहाता तालुक्यामधील लोहगाव येथील गृहसंकुल बांधकामाची पाहाणी केली.







## आवास योजनांच्या प्रभावी अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापनासाठी मा.प्रधान सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग यांच्या अध्यक्षतेखाली बैठका

राज्यात राबविण्यात येणाऱ्या केंद्र व राज्य पुरस्कृत विविध आवास योजनांच्या प्रभावी अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापनासाठी मा.प्रधान सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग श्री.एकनाथ डवले यांच्या अध्यक्षतेखाली व संचालक, ग्रामीण गृहनिर्माण डॉ.राजाराम दिघे यांच्या उपस्थितीत माहे जानेवारी ते मार्च, २०२५ या कालावधीत सर्व विभागीय आयुक्त कार्यालयाचे उपायुक्त (विकास), जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक यांच्या आढावा बैठका घेतल्या. या बैठकांमध्ये संचालक, ग्रामीण गृहनिर्माण यांनी ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या प्रगतीबाबत सादरीकरण केले.

मा. प्रधान सचिव, ग्रामविकास व पंचायतराज यांनी मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांनी विधान भवनामध्ये मा. राज्यपाल अभिभाषणाच्या चर्चेवर उत्तर देतांना ग्रामविकास व पंचायत राज विभागाने प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण मध्ये केलेल्या कामाबाबत अभिनंदनाची माहिती दिली व उपस्थित सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.

मा. प्रधान सचिव यांनी प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण टप्पा- १ अंतर्गत अपूर्ण घरकुलांचा जिल्हानिहाय आढावा घेतला व सर्व अपूर्ण घरकुले दिनांक ३१ मे, २०२५ पर्यंत पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण टप्पा- २ अंतर्गत राज्यातील उर्वरित घरकुलांना मंजूरी व उर्वरीत घरकुलांना पहिला हप्ता वितरण प्रक्रिया दिनांक ३१ मार्च, २०२५ अखेर पूर्ण करण्याचे निर्देश दिले. तसेच टप्पा-२ अंतर्गत सर्व घरकुलांची कामे तातडीने सुरु करण्याचे सूचित केले. घरकुल बांधकामाच्या टप्प्यानुसार सर्व हप्ते विनाविलंब वितरित करण्याचे सांगितले. तसेच सर्व राज्य पुरस्कृत ग्रामीण आवास योजनांतर्गत सर्व घरकुले त्वरीत मंजूर करावी व ९०% घरकुले दिनांक ३१ मे, २०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे मा. प्रधान सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग यांनी या बैठकांमध्ये सुचित केले.

ग्रामस्तरावर ग्रामपंचायत अधिकारी व ग्राम रोजगार सेवक, तालुकास्तरावर तालुका ऑपरेटर व नरेगा ऑपरेटर, जिल्हास्तरावर प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (नरेगा) यांनी समन्वय ठेवून लाभार्थ्यांचे मस्टर्स वेळेवर निर्गमित होतील व त्यांना देयके वेळेत मिळतील याची खात्री करावी, असे संचालक, ग्रामीण गृहनिर्माण यांनी सांगितले.




## आवास योजनांच्या उद्दिष्टपूर्तीसाठी पुणे विभागीय उप आयुक्तांच्या क्षेत्रीय भेटी

दिनांक २२ फेब्रुवारी, २०२५ रोजी पुणे येथे मा.केंद्रीय मंत्री, गृह व सहकार मंत्रालय, भारत सरकार यांच्या शुभहस्ते प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत मंजुरी पत्र वितरण व पहिला हप्ता वितरण कार्यक्रम आयोजित केला होता. त्यानुषंगाने नियोजन करण्याकरीता व आवास योजनांच्या उद्दिष्टपूर्तीसाठी उप आयुक्त(विकास), पुणे विभाग श्री.विजय मुळीक यांनी दिनांक १० फेब्रुवारी, २०२५ रोजी पंचायत समिती इंदापूर येथे सर्व विभाग प्रमुख/ग्रामसेवक यांची आढावा बैठक घेतली.

याबैठकीमध्ये श्री.विजय मुळीक यांनी राज्यस्तरीय कार्यक्रमाकरीता प्रत्यक्षात उपस्थित राहणारे लाभार्थी व पंचायत समिती तसेच ग्रामस्तरावर कार्यक्रमाच्या आयोजन याविषयीच्या नियोजनाबाबत आढावा घेतला. तसेच प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत घरकुलांना मंजुरी व पहिला हप्ता वितरणाची प्रगती या विषयी आढावा घेतला.

त्यानंतर उप आयुक्त (विकास) यांनी १०० दिवस कृती कार्यक्रमाच्या अनुषंगाने आढावा घेतला. तसेच पंचायत समिती स्तरावरील अभिलेख वर्गीकरणाची प्रत्यक्षात तपासणी केली.



## मा.केंद्रीय मंत्री, गृह व सहकार मंत्रालय, भारत सरकार यांच्या शुभहस्ते महा आवास अभियान पुस्तिका, अभियान पोस्टर प्रकाशन व लघुपट प्रदर्शित

सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या कामात गतिमानता व गुणवत्ता आणण्यासाठी महाराष्ट्र राज्यात दिनांक ०१ जानेवारी, २०२५ ते दिनांक १० एप्रिल, २०२५ या १०० दिवसांच्या कालावधीत 'महा आवास अभियान २०२४-२५' राबविण्यात येत आहे. या अभियानाच्या प्रचार, प्रसिध्दी व जन-जागृतीसाठी राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाने 'अभियान पुस्तिका' व 'अभियान पोस्टर' ची निर्मिती केली आहे.

'अभियान पुस्तिका' व 'अभियान पोस्टर' चे प्रकाशन मा.केंद्रीय मंत्री, गृह व सहकार मंत्रालय, भारत सरकार श्री.अमित शाह यांच्या शुभहस्ते व मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली तसेच मा.उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री.एकनाथ शिंदे, मा.उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री.अजित पवार, मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज श्री.जयकुमार गोरे, मा.राज्यमंत्री, ग्राम विकास व पंचायत राज योगेश कदम, मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन श्रीमती सुजाता सौनिक, मा.प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज श्री.एकनाथ डवले, मा.संचालक, ग्रामीण गृहनिर्माण डॉ.राजाराम दिघे व इतर मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत २० लक्ष लाभार्थ्यांना मंजुरी पत्र वितरण व १० लक्ष लाभार्थ्यांना प्रथम हप्ता वितरण कार्यक्रमाप्रसंगी दिनांक २२ फेब्रुवारी, २०२५ रोजी पुणे येथे करण्यात आले.

या कार्यक्रमाप्रसंगी राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाने प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत २० लक्ष लाभार्थ्यांना मंजुरी पत्र वितरण व १० लक्ष लाभार्थ्यांना प्रथम हप्ता वितरण उद्दिष्टपूर्तीसाठी केलेली कामगिरी व राज्यात राबविण्यात आलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमांची यशोगाथा सांगणारा लघुपट तयार केला. हा लघुपट या कार्यक्रमाप्रसंगी प्रदर्शित करण्यात आला.





## मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या शुभहस्ते 'महा आवास त्रैमासिक' चे प्रकाशन

दिनांक ०३ फेब्रुवारी, २०२५ रोजी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली व मा. उप मुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत मुख्यमंत्री वॉररूम मध्ये केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत आवास योजनांची आढावा बैठक मंत्रालय मुंबई येथे संपन्न झाली.

याप्रसंगी ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रातील घडामोडी व नाविण्यपूर्ण उपक्रमांचा मागोवा घेणारे राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाचे माहे ऑक्टोबर ते डिसेंबर, २०२४ या कालावधीतील 'महा आवास त्रैमासिक' चे प्रकाशन मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते व मा. उप मुख्यमंत्री अजित पवार, मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज श्री. जयकुमार गोरे, मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता श्री. गुलाबराव पाटील, मा.राज्यमंत्री, ग्राम विकास व पंचायत राज श्री. योगेश कदम, मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन श्रीमती सुजाता सौनिक, मा.प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग श्री.एकनाथ डवले व मा.संचालक, ग्रामीण गृहनिर्माण डॉ.राजाराम दिघे आदी मान्यवर उपस्थितीत करण्यात आले.



## प्रजासत्ताक दिनानिमित्त ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या चित्ररथाचे संचलन

भारताच्या ७६ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त दिनांक २६ जानेवारी २०२५ रोजी ग्राम विकास व पंचायत राज विभागाच्या वतीने राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण व महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) या कार्यालयाने सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजना व ग्रामीण महिलांची प्रगती या संकल्पनेवर आधारित चित्ररथ तयार करून शिवाजी पार्क, दादर, मुंबई येथे संपन्न झालेल्या शासकीय परेडमध्ये संचलनात सहभागी करण्यात आला होता.

याप्रसंगी मा.प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज श्री.एकनाथ डवले, मा.संचालक, ग्रामीण गृहनिर्माण डॉ.राजाराम दिघे उपस्थित होते. राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाचे वास्तुविशारद श्री.परमेश्वर शेलार यांनी चित्ररथा सोबत संचलन केले.

या चित्ररथाच्या माध्यमातून राज्यात राबविण्यात येणाऱ्या विविध ग्रामीण गृहनिर्माण योजना, घरकुल मॉडेल, व महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) या कार्यालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती दर्शविण्यात आली.






## जागतिक महिला दिनी महिला लाभार्थ्यांचे हस्ते घरकुल भुमीपूजन व गृहप्रवेश

'महा आवास अभियान २०२४-२५' ची प्रभावी अंमलबजावणी राज्यात सुरू असून या अभियानात महिलांचा सक्रिय सहभाग घेण्यासाठी व सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या प्रभावी प्रचार, प्रसिध्दी व जन-जागृतीसाठी दिनांक ८ मार्च, २०२५ रोजीच्या जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून महिला सन्मानासाठी विविध उपक्रम राबविण्यात आले.

यामध्ये ग्रामीण आवास योजनांतर्गत घरकुल पूर्ण झालेल्या महिला लाभार्थ्यांचे एकत्रित गृहप्रवेश सोहळ्याचे आयोजन, बचत गटात समाविष्ट नसलेल्या महिला घरकुल लाभार्थ्यांचा स्वयंसहायत्ता बचत गटात समावेश, ग्रामीण आवास योजनांतर्गत ज्या महिला लाभार्थ्यांनी अद्यापपर्यंत घरकुल बांधकाम सुरु केले नाही, अशा महिला लाभार्थ्यांचा एकत्रित भूमीपूजन कार्यक्रमाचे आयोजन, ग्रामीण गवंडी प्रशिक्षणांतर्गत इच्छुक महिलांचा समावेश व गवंडी प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण केलेल्या महिलांचा सत्कार, अभियानाच्या यशस्वीतेसाठी उत्स्फूर्तपणे सहभागी महिला/लाभार्थी/कर्मचारी/अधिकारी/पदाधिकारी यांचा सत्कार, महिला लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी गृहकर्ज उपलब्धतेसाठी बँक मेळाव्याचे आयोजन, पंचायत समिती आवारामध्ये पूर्ण झालेल्या डेमो हाऊसमध्ये कॉप-शॉप सुरू करण्यासाठी स्वयंसहायत्ता महिला बचत गटांना प्राधान्य, घरकुले पूर्ण झालेल्या महिला घरकुल लाभार्थ्यांना विविध शासकीय योजनांच्या कृतीसंगमातून लाभ, घरकुले पूर्ण झालेल्या सर्व महिला लाभार्थ्यांच्या नावाची नोंद ग्रामपंचायतीच्या मालमत्ता नोंदवही मध्ये घेणे, इ. कार्यक्रम आयोजित केले.

जागतिक महिला दिनी महिला लाभार्थ्यांच्या हस्ते भूमीपूजन व गृह प्रवेश कार्यक्रमाच्या आयोजनामुळे महिला घरकुल लाभार्थी, ग्रामीण भागातील सर्व महिला व सर्व ग्रामस्थांना प्रोत्साहन मिळाले आहे.





## मा.केंद्रीय मंत्री, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांची समन्वय बैठक संपन्न

दिनांक ०३ जानेवारी, २०२५ रोजी मा.केंद्रीय ग्रामीण विकास व कृषि एवं किसान कल्याण मंत्रालय, भारत सरकार श्री.शिवराज सिंह चौहान यांनी देशातील सर्व राज्यांची ग्राम विकास व पंचायत राज विभागाच्या कामासंदर्भात समन्वय बैठक घेतली.

या बैठकीला व्हिडिओ कॉन्फरन्स द्वारे महाराष्ट्र राज्यातून मा. मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज श्री.जयकुमार गोरे व मा.संचालक, ग्रामीण गृहनिर्माण यांच्यासह ग्राम विकास विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीमध्ये मा. मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज श्री.जयकुमार गोरे यांनी काही महत्वाचे मुद्दे मांडले. यामध्ये सन २०२५ मध्ये 'गरिबीमुक्त गाव' हा आमचा संकल्प असल्याचे सांगितले. याकरीता आदरणीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदीजी यांना शुभेच्छा आणि माझीही इच्छा आहे की गावे गरिबीमुक्त व्हावीत. यासाठी आम्ही एकत्र काम करू. प्रधानमंत्री ग्रामीण सडक योजनेचा चौथा टप्पा सुरू होत आहे. पात्र वस्त्या शोधण्यासाठी सर्वेक्षण सुरू असून लवकरात लवकर हे काम पूर्ण करण्यासाठी आमची सर्व यंत्रणा प्रयत्नशील असल्याचे मा.मंत्री महोदयांनी सांगितले.

गेल्या १० वर्षात प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत ग्रामीण भागात ३.४५ कोटी घरे बांधण्यात आली आहेत. गेल्या ८ वर्षात दररोज १० हजार घरे बांधली जात असल्याचे मा. मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज श्री.जयकुमार गोरे यांनी या समन्वय बैठकीमध्ये सांगितले.

मा. पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी यांनी सर्व योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून त्याचा लाभ लोकांना मिळवून देण्याचे निर्देश दिले आहे. त्यानुंषगाने सर्वांनी एकत्र येवून काम करण्याची गरज असल्याचे यावेळी मा.केंद्रीय ग्रामीण विकास व कृषि एवं किसान कल्याण मंत्रालय, भारत सरकार श्री.शिवराज सिंह चौहान यांनी सांगितले.



## मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय कृती दलाची बैठक संपन्न

दिनांक ०६ जानेवारी, २०२५ रोजी मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन श्रीमती सुजाता सौनिक यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय कृती दलाची (Task Force) बैठक मंत्रालय, मुंबई येथे संपन्न झाली.

या बैठकीला मा.अतिरिक्त मुख्य सचिव, महसूल व वन विभाग श्री. राजेश कुमार, मा.प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग श्री. एकनाथ डवले, मा.प्रधान सचिव, इतर मागास बहुजन कल्याण विभाग श्रीमती विनिता सिंगल, मा.सचिव, आदिवासी विकास विभाग श्री. विजय वाघमारे, मा.संचालक, ग्रामीण गृहनिर्माण डॉ.राजाराम दिघे यांच्यासह सर्व विभागाचे विभागीय आयुक्त दूरदृष्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

मा.प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज यांनी सादरीकरणात सांगितले की, राज्यामध्ये केंद्रपुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत एकूण १,०२,८०६ भूमिहिन लाभार्थ्यांपैकी ९४,७५८ भूमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. ज्या ग्रामपंचायतीमध्ये पुरेशी जागा उपलब्ध नाही किंवा जागेच्या किंमती जास्त आहेत, अशा ठिकाणी २,९४३ बहुमजली इमारतीद्वारे ६,५०४ भूमिहीन लाभार्थ्यांना, १,५८९ गृहसंकूलांद्वारे १९,०६७ भूमिहीन लाभार्थींना व ३७३ अपार्टमेंट द्वारे २,६११ भूमिहीन लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे.

ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या लाभार्थींना मुलभूत नागरी सुविधा मिळतील याची काळजी घ्यावी व प्रधानमंत्री सूर्यघर मुफ्त बिजली योजना सारख्या गृह निर्माण योजनेतील घरकुलांना सौर ऊर्जेचा लाभ द्यावा. असे निर्देश मा. अध्यक्ष तथा मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांनी दिले.

भूमिहीन लाभार्थ्यांना गायरान जमिनीवर घरकुल बांधण्यासाठी सार्वजनिक प्रयोजन म्हणून पुणे जिल्हयाने जागा उपलब्ध करुन दिलेली आहे, त्याप्रमाणे इतर जिल्ह्यांनी कार्यवाही करण्याच्या सूचना मा.प्रधान सचिव, ग्रामविकास यांनी दिल्या.



## गरजू कुटुंबांना घरे देण्यासाठी मिशन मोडवर काम करा - मा.पालकमंत्री, कोल्हापूर

दिनांक ०२ फेब्रुवारी, २०२५ रोजी प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण टप्पा- २ ची आढावा बैठक मा.मंत्री, सार्वजनिक आरोग्य तथा मा.पालकमंत्री, कोल्हापुर श्री.प्रकाश आबिटकर यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयातील नवीन सभागृहात संपन्न झाली. यावेळी केंद्र व राज्य पुरस्कृत योजनांतून कोल्हापूर जिल्ह्यातील गरजू कुटुंबांसाठी कमीत कमी ५० हजार हक्काची घरे उपलब्ध करुन देण्यासाठी महसूल, समाज कल्याण, जिल्हा परिषद व संबंधित यंत्रणेने मिशन मोडवर काम करावे, अशा सूचना मा.मंत्री, सार्वजनिक आरोग्य तथा कोल्हापूर जिल्ह्याचे पालकमंत्री श्री.प्रकाश आबिटकर यांनी केल्या.

यावेळी मा.आमदार श्री.अशोक माने, जिल्हाधिकारी श्री.अमोल येडगे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.कार्तिकेयन एस., जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक श्रीमती सुषमा देसाई, निवासी उपजिल्हाधिकारी श्री.संजय तेली, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक श्री.गणेश गोडसे, समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त श्री.सचिन साळे आदी उपस्थित होते.

पालकमंत्री श्री. आबिटकर म्हणाले, प्रधानमंत्री आवास योजना ही केंद्र व राज्य सरकारची अत्यंत महत्त्वपूर्ण योजना आहे. गरजू कुटुंबांना हक्काचे घर मिळवून देण्यासाठी सर्वांनी समन्वय साधून झोकून देऊन काम करण्याचे मा.पालकमंत्र्यांनी सूचित केले.



## धुळे जिल्ह्यात प्रलंबित घरकुले पूर्णत्वासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा दौरा

दिनांक २१ जानेवारी, २०२५ रोजी प्रलंबित घरकुले पूर्ण करण्यासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.विशाल नरवाडे यांनी शिरपूर तालुक्यातील वाठोडे गावातील घरकुलाना भेटी देऊन घरकुले तात्काळ सुरू करण्याचे सूचित केले. घरकुले प्रलंबित राहण्याची कारणे शोधून लाभार्थ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी सर्वोत्तोपरी प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे श्री.विशाल नरवाडे यांनी सांगितले.

यावेळी उप मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.गणेश मोरे, सहाय्यक प्रकल्प अधिकारी श्रीमती भावना पाटील, गट विकास अधिकारी श्री. पवार व इतर अधिकारी उपस्थित होते.




## चंद्रपुर जिल्ह्यात घरकुल लाभार्थ्यांना जप्त केलेल्या वाळूचे मोफत वाटप

'महा आवास अभियान २०२४-२५' अंतर्गत सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी वाळू उपलब्ध करण्यासाठी विविध मार्गाने उपलब्ध होणाऱ्या वाळूची 'सॅण्ड बँक' तयार करण्याचा उपक्रम राबविण्यात येत आहे.

त्यानुसार दिनांक १७ मार्च, २०२५ रोजी चंद्रपुर जिल्ह्यातील पंचायत समिती ब्रम्हपुरी व तहसील कार्यालय ब्रम्हपुरी यांच्या संयुक्त प्रयत्नाने तालुक्यातील घरकुल लाभार्थ्यांना जप्त केलेल्या वाळूच्या मोफत वाटप करण्यात आले.

वाळू अभावी घरकुल बांधकाम अपूर्ण असलेल्या लाभार्थ्यांना काम सुरू करून घरकुले लवकरात लवकर पूर्ण करण्याकरीता १०० ब्रास वाळूचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी ब्रम्हपूरी पंचायत समितीचे गट विकास अधिकारी, तहसील कार्यालयाचे मंडळ अधिकारी, नोडल अधिकारी व घरकुल विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



## रायगड जिल्ह्यात गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर ३ हजार १७७ लाभार्थ्यांचा गृहप्रवेश

मा.आमदार श्री.महेंद्र दळवी यांच्या शुभहस्ते रायगड जिल्ह्यात विविध आवास योजनेतील ३,१७७ लाभार्थ्यांचा गृहप्रवेश गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर दिनांक ३० मार्च, २०२५ रोजी करण्यात आला.

केंद्र व राज्य पुरस्कृत घरकुल योजने अंतर्गत रायगड जिल्हा परिषदेच्या जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत लाभार्थी कुटुंबीयांना गृहप्रवेश करण्यासाठी गावागावात कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या अनुषंगाने अलिबाग तालुक्यातील वरसोली येथे मा.आमदार श्री.महेंद्र दळवी यांच्या शुभहस्ते आयोजित कार्यक्रमात गावातील ४ कुटुंबांचा गृहप्रवेश कार्यक्रम करण्यात आला.

यावेळी रायगडचे जिल्हाधिकारी श्री.किशन जावळे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.भरत बास्टेवाड, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक श्रीमती प्रियदर्शिनी मोरे, अलिबाग पंचायत समितीचे गट विकास अधिकारी श्री.दाजी दाईंगडे यांच्यासह अलिबाग पंचायत समितीचे व वरसोली ग्रामपंचायतीचे पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी, ग्रामस्थ व लाभार्थी उपस्थित होते.



## आवास योजनांच्या कामांना गती देण्यासाठी सांगली मध्ये अधिकाऱ्यांच्या क्षेत्रीय भेटी

सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या उद्दिष्टपूर्तीसाठी सांगली जिल्हा परिषदेचे, मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती तृप्ती धोडमिसे यांच्या अध्यक्षतेखाली व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या, प्रकल्प संचालक श्रीमती नंदिनी घाणेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत तालुकास्तरावर क्षेत्रीय भेटी देवून आढावा बैठका व घरकुल योजनांच्या कामांची पाहणी केली.

श्रीमती तृप्ती धोडमिसे यांनी जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्यांना क्षेत्रीय भेटी देऊन घरकुल योजनांच्या कामांचा आढावा घेतला. या बैठकीमध्ये त्यांनी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा- १ अंतर्गत अपूर्ण घरकुले तात्काळ पूर्ण करणे व प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत उद्दिष्टानुसार उर्वरित घरकुलांना मंजुरी देऊन प्रथम हप्ता वितरणाची कार्यवाही पूर्ण करण्याच्या सूचित केले.

तसेच श्रीमती नंदिनी घाणेकर यांनी घरकुल प्रस्ताव मंजुरी, जागा वाद, सामाईक जागा, नरेगा अंतर्गत येणाऱ्या विविध अडचणींबाबत मार्गदर्शन केले.

या दौरा कार्यक्रमा दरम्यान लाभार्थ्यांना प्रोत्साहीत करून घरकुल बांधकाम त्वरीत सुरू करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी व प्रकल्प संचालक यांच्या शुभहस्ते गावांना क्षेत्रीय भेटी देवून मंजूर घरकुलांचे भूमिपूजन करण्यात आले.




## किनवट येथे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी घेतला सर्व आवास योजनांचा आढावा

दिनांक २७ मार्च, २०२५ रोजी नांदेड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मेघना कावली यांच्या अध्यक्षतेखाली व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक डॉ.संजय तुबाकले यांच्या उपस्थितीत पंचायत समिती किनवट येथे सर्व आवास योजनांची आढावा बैठक घेण्यात आली.

यावेळी किनवट पंचायत समितीचे गट विकास अधिकारी श्री.कांबळे, विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समितीचे सर्व विभाग प्रमुख, तालुक्यांतर्गत सर्व ग्रामपंचायतींचे ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता,तालुका डेटा एन्ट्री ऑपरेटर व इतर संबंधित अधिकारी उपस्थित होते.



# प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत पात्र कुटुंबांचे सर्वेक्षण (Awaas+ २०२४ Survey)



प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण अंतर्गत आवास प्लस सर्वेक्षण २०१८ मध्ये तयार करण्यात आलेल्या प्रतिक्षा यादी (Priority List) मध्ये समाविष्ट न झालेले व सिस्टीमद्वारे अपात्र झालेले परंतु सद्यस्थितीत पात्र असलेले कुटुंबाचे (Potentially eligible households under PMAY-G) प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-2 अंतर्गत नवीन Exclusion Criteria नुसार सर्वेक्षण करण्याच्या सूचना ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांनी दिल्या आहेत.

त्यानुसार राज्यामध्ये Awaas+ 2024 मोबाईल ॲपमध्ये सर्वेक्षण करण्यासाठी सर्व ग्रामपंचायत अधिकाऱ्यांची (ग्रामसेवक/ग्राम विकास अधिकारी) सर्वेक्षक (Surveyor) म्हणून ग्रामपंचायत निहाय नोंदणी, E-KYC व SOP बाबत या कळविण्यात आले आहे.

प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत Awaas Plus 2024 Survey याबाबत सर्व संबंधित अधिकारी, कर्मचारी जसे-प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, गट विकास अधिकारी, पंचायत समिती व ग्रामपंचायत अधिकारी (ग्रामसेवक/ग्राम विकास अधिकारी) यांचे ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार ऑनलाइन पध्दतीने वेबीनारद्वारे दोनवेळा orientation करण्यात आले आहे. त्यानुसार मा.प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग यांनी Awaas + 2024 Survey करण्याच्या सविस्तर सूचना दिल्या आहेत.

NIC नवी दिल्ली यांचेकडील Team (Principal Trainers) यांच्यामार्फत सर्व विभागीय प्रोग्रामर व सर्व जिल्हा प्रोग्रामर यांना Master Trainer म्हणून प्रशिक्षण देण्यासाठी दोन दिवसीय राज्यस्तरीय Training of Trainers (ToT) दिनांक ११ व १२ मार्च, २०२५ रोजी बेलापूर, नवी मुंबई येथे आयोजित करण्यात आले होते.

या प्रशिक्षित Master Trainers च्या द्वारे जिल्हास्तरीय Orientation व तालुकास्तरीय सर्वेक्षकांचे प्रशिक्षण आयोजनाचा कालबध्द कार्यक्रम दिनांक २९ मार्च, २०२५ पर्यंत राबविण्याबाबत व त्यानंतर विहीत कालावधीत सर्वेक्षण पूर्ण करण्याचे सूचित केले होते. त्यानुसार सर्वस्तरावर प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

मा. संचालक, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांनी Awaas+ 2024 चे सर्वेक्षण पूर्ण करण्यासाठी दिनांक ३० एप्रिल, २०२५ पर्यंतची अंतिम मुदत दिली असून तोपर्यंत सदर सर्वेक्षण पूर्ण करून घेण्यासंबंधी सूचना मा.संचालक, ग्रामीण गृहनिर्माण, महाराष्ट्र राज्य यांनी निर्गमित केल्या आहेत. त्यादृष्टीने सर्व स्तरावर Awaas + 2024 चे सर्वेक्षण विहीत कालावधीत पूर्ण करण्याची नियोजनबध्द कार्यवाही सुरू असून यामुळे लाखो गरीब, गरजू, भुमिहीन व बेघरांचे स्वतःच्या हक्काच्या पक्क्या घराचे स्वप्न पूर्ण होणार आहे. त्यासाठी जास्तीत जास्त लोकांना या सर्वेक्षणाचा लाभ घेतला पाहीजे.





# प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-१

## संचित प्रगती अहवाल - ३१ मार्च, २०२५

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक | राष्ट्रीय रँक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सिंधुदुर्ग | ५,००८ | ५,००८ | ४,९८८ | ९९.६० | १ | ५९ |
| २ | रायगड | ९,५९२ | ९,५९२ | ९,५५० | ९९.५६ | २ | १०३ |
| ३ | रत्नागिरी | ९,६१७ | ९,६१७ | ९,५६९ | ९९.५० | ३ | ७६ |
| ४ | पालघर | ३५,०८३ | ३५,०८३ | ३४,६२७ | ९८.७० | ५ | १४३ |
| ५ | ठाणे | ९,४७५ | ९,४७५ | ९,२६८ | ९७.८२ | ८ | १५५ |
| कोकण विभाग | | ६८,७७५ | ६८,७७५ | ६८,००२ | ९८.८८ | १ | |
| ६ | गोंदिया | ९५,१५७ | ९५,१५७ | ९४,२२७ | ९९.०२ | ४ | १५८ |
| ७ | वर्धा | १७,३६७ | १७,३६७ | १६,६२७ | ९५.७४ | १० | ९१ |
| ८ | गडचिरोली | ३१,४८३ | ३१,४८३ | ३०,१२७ | ९५.६९ | ११ | २२४ |
| ९ | भंडारा | ६३,३८६ | ६३,३८६ | ६०,३८७ | ९५.२७ | १३ | २६१ |
| १० | चंद्रपूर | ४१,८६३ | ४१,८६३ | ३९,२२२ | ९३.६९ | १७ | १५४ |
| ११ | नागपूर | ३५,६४७ | ३५,६४७ | ३३,२८४ | ९३.३७ | १८ | ३३० |
| नागपूर विभाग | | २,८४,९०३ | २,८४,९०३ | २.७३,८७४ | ९६.१३ | २ | |
| १२ | नाशिक | ८८,८०७ | ८८,८०७ | ८५,१०२ | ९५.८३ | ९ | १८९ |
| १३ | नंदुरबार | १,१८,२७६ | १,१८,२७६ | १,१२,८५२ | ९५.४१ | १२ | ३११ |
| १४ | अहमदनगर | ५८,८४२ | ५८,८४२ | ५५,५०९ | ९४.३४ | १६ | १३७ |
| १५ | धुळे | ६४,५७६ | ६४,५७६ | ६०,२२७ | ९३.२७ | १९ | ३१८ |
| १६ | जळगाव | ७६,८२६ | ७६,८२६ | ६७,३५४ | ८७.६७ | ३३ | ५१३ |
| नाशिक विभाग | | ४,०७,३२७ | ४,०७,३२७ | ३,८१,०४४ | ९३.५५ | ३ | |
| १७ | सातारा | १४,२६७ | १४,२६७ | १३,९८० | ९७.९९ | ७ | ११ |
| १८ | कोल्हापूर | १६,३६२ | १६,३६२ | १५,४९१ | ९४.६८ | १४ | १२४ |
| १९ | सांगली | २०,४२१ | २०,४२१ | १८,८०५ | ९२.०९ | २१ | ४९१ |
| २० | सोलापूर | ४४,०८८ | ४४,०८८ | ४०,०४७ | ९०.८३ | २७ | ३०३ |
| २१ | पुणे | १८,६०२ | १८,६०२ | १६,७१० | ८९.८३ | ३० | ४३८ |
| पुणे विभाग | | १,१३,७४० | १,१३,७४० | १,०५,०३३ | ९२.३४ | ४ | |
| २२ | वाशिम | १८,२४४ | १८,२४४ | १७,९०८ | ९८.१६ | ६ | ५६ |
| २३ | अकोला | ४६,४३९ | ४६,४३९ | ४३,९२२ | ९४.५८ | १५ | ३७७ |
| २४ | अमरावती | ८७,३०५ | ८७,३०५ | ८०,५०८ | ९२.२१ | २० | ५०७ |
| २५ | यवतमाळ | ६२,६८७ | ६२,६८७ | ५७,५८६ | ९१.८६ | २३ | १४८ |
| २६ | बुलढाणा | ३९,६२१ | ३९,६२१ | ३४,६४५ | ८७.४४ | ३४ | ४९२ |
| अमरावती विभाग | | २,५४,२९६ | २,५४,२९६ | २.३४,५६९ | ९२.२४ | ५ | |
| २७ | धाराशिव | १२,८४८ | १२,८४८ | ११,८१० | ९१.९२ | २२ | ३७२ |
| २८ | जालना | २३,०६५ | २३,०६५ | २१,११० | ९१.५२ | २४ | ३१६ |
| २९ | हिंगोली | १६,८६७ | १६,८६७ | १५,४११ | ९१.३७ | २५ | १०० |
| ३० | बीड | ३४,२३४ | ३४,२३४ | ३१,२३५ | ९१.२४ | २६ | ३९४ |
| ३१ | छत्रपती संभाजी नगर | ३५,००३ | ३५,००३ | ३१,४९३ | ८९.९७ | २८ | २८० |
| ३२ | लातूर | १८,९४० | १८,९४० | १७,०१५ | ८९.८४ | २९ | ४१६ |
| ३३ | परभणी | १८,५४२ | १८,५४२ | १६,६५० | ८९.८० | ३१ | १४० |
| ३४ | नांदेड | ६८,२९६ | ६८,२९६ | ६०,५९१ | ८८.७२ | ३२ | ५३५ |
| छत्रपती संभाजी नगर विभाग | | २,२७,७९५ | २,२७,७९५ | २,०५,३१५ | ९०.१३ | ६ | |
| एकूण | | १३,५६,८३६ | १३,५६,८३६ | १२,६७,८३७ | ९३.४४ | | |

# प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२

## संचित प्रगती अहवाल - ३१ मार्च, २०२५

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सिंधुदुर्ग | १०,०२७ | १०,०१३ | २९ | ९९.८६ | २ |
| २ | रायगड | १५,६४९ | १५,६०८ | १६५ | ९९.७४ | ३ |
| ३ | रत्नागिरी | १९,२७४ | १९,१६१ | ३१० | ९९.४१ | ४ |
| ४ | पालघर | ६०,८४८ | ६०,४४१ | ५६८ | ९९.३३ | ५ |
| ५ | ठाणे | १८,२३१ | १८,०१९ | १०३ | ९८.८४ | ८ |
| | कोकण विभाग | १,२४,०२९ | १,२३,२४२ | १,१७५ | ९९.३७ | १ |
| ६ | गोंदिया | ४७,८५१ | ४७,३४९ | १,९३२ | ९८.९५ | ७ |
| ७ | भंडारा | ३६,३३७ | ३५,६५९ | २८८ | ९८.१३ | १० |
| ८ | गडचिरोली | ३७,७९६ | ३७,०७३ | १,१७८ | ९८.०९ | ११ |
| ९ | चंद्रपूर | ४८,२९५ | ४६,७४६ | ३०८ | ९६.७९ | १४ |
| १० | नागपूर | १९,९६६ | १९,२५४ | २५२ | ९६.४३ | १५ |
| ११ | वर्धा | २०,३२७ | १९,४२४ | ४७३ | ९५.५६ | २१ |
| | नागपूर विभाग | २,१०,५७२ | २,०५,५०५ | ४,४३१ | ९७.५९ | २ |
| १२ | अहमदनगर | ८३,५६७ | ८२,९८३ | ७५७ | ९९.३० | ६ |
| १३ | नाशिक | १,४४,३२१ | १,४०,३८४ | १,२२६ | ९७.२७ | १३ |
| १४ | जळगाव | ९०,१३५ | ८६,२७८ | ९३९ | ९५.७२ | १७ |
| १५ | धुळे | ९३,७२१ | ८९,६२९ | ४७७ | ९५.६३ | १८ |
| १६ | नंदुरबार | १,३१,९०१ | १,२५,६४४ | ३०८ | ९५.२६ | २३ |
| | नाशिक विभाग | ५,४३,६४५ | ५,२४,९१८ | ३,७०७ | ९६.५६ | ३ |
| १७ | सोलापूर | ६३,०५२ | ६१,३८६ | २७४ | ९७.३६ | १२ |
| १८ | पुणे | ३५,४६९ | ३३,८०८ | १७३ | ९५.३२ | २२ |
| १९ | सातारा | ३९,६७७ | ३७,७८६ | ३०४ | ९५.२३ | २४ |
| २० | कोल्हापूर | ४१,१८७ | ३८,८३८ | १३७ | ९४.३० | २७ |
| २१ | सांगली | ३१,२३३ | २८,७७७ | २७८ | ९२.१४ | २९ |
| | पुणे विभाग | २,१०,६१८ | २,००,५९५ | १,१६६ | ९५.२४ | ४ |
| २२ | वाशिम | ४५,४६८ | ४५,४६० | ६८३ | ९९.९८ | १ |
| २३ | अकोला | २८,५६२ | २८,१९७ | १,२६४ | ९८.७२ | ९ |
| २४ | यवतमाळ | १,१९,२९६ | १,१४,०६५ | ८२२ | ९५.६२ | १९ |
| २५ | अमरावती | ५५,०३५ | ५०,८९८ | ८५४ | ९२.४८ | २८ |
| २६ | बुलढाणा | ६४,०१७ | ५७,१४४ | १७६ | ८९.२६ | ३४ |
| | अमरावती विभाग | ३,१२,३७८ | २,९५,७६४ | ३,७९९ | ९४.६८ | ५ |
| २७ | लातूर | ५०,६९४ | ४८,६१२ | ४०२ | ९५.८९ | १६ |
| २८ | बीड | ८०,२६१ | ७६,७१३ | २,१८६ | ९५.५८ | २० |
| २९ | नांदेड | १,५०,६२५ | १,४३,४४२ | ६९३ | ९५.२३ | २५ |
| ३० | छत्रपती संभाजी नगर | ७४,०५३ | ७०,२४७ | १,०३१ | ९४.८६ | २६ |
| ३१ | परभणी | ५४,३६७ | ४९,९३४ | ४१९ | ९१.८५ | ३० |
| ३२ | धाराशिव | ३७,९८३ | ३४,८१९ | ६६२ | ९१.६७ | ३१ |
| ३३ | हिंगोली | ४९,२४७ | ४५,०९५ | ७९५ | ९१.५७ | ३२ |
| ३४ | जालना | ६७,७७२ | ६१,२९२ | ३६४ | ९०.४४ | ३३ |
| | छत्रपती संभाजी नगर विभाग | ५,६५,००२ | ५,३०,१५४ | ६,५५२ | ९३.८३ | ६ |
| | एकूण | १९,६६,७६७ | १८,८०,१७८ | २०,८३० | ९५.६० | |

# रमाई आवास योजना

## संचित प्रगती अहवाल - ३१ मार्च, २०२५

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सिंधुदुर्ग | २,३२९ | २,१५८ | २,०७८ | ९६.२९ | १ |
| २ | रत्नागिरी | ७,०७५ | ६,८५१ | ६,२७५ | ९१.५९ | २ |
| ३ | रायगड | २,९१४ | २,४३६ | २,०५७ | ८४.४४ | ७ |
| ४ | ठाणे | १,८२६ | १,५६६ | १,२१५ | ७७.५९ | १५ |
| ५ | पालघर | ६९८ | ६२५ | ४५८ | ७३.२८ | २३ |
| **कोकण विभाग** | | **१४,८४२** | **१३,६३६** | **१२,०८३** | **८८.६१** | **१** |
| ६ | सातारा | १२,१०८ | ११,९०३ | १०,६७८ | ८९.७१ | ३ |
| ७ | सांगली | १०,६६४ | ९,६४४ | ८,१७५ | ८४.७७ | ६ |
| ८ | पुणे | ११,४१९ | १०,६१५ | ८,६८८ | ८१.८५ | १० |
| ९ | कोल्हापूर | १७,०३६ | १६,२८५ | १३,१०३ | ८०.४६ | १२ |
| १० | सोलापूर | २५,०९० | २१,५७० | १६,८६४ | ७८.१८ | १४ |
| **पुणे विभाग** | | **७६,३१७** | **७०,०१७** | **५७,५०८** | **८२.१३** | **२** |
| ११ | अहमदनगर | ३३,२५४ | ३२,२६७ | २७,६१६ | ८५.५९ | ५ |
| १२ | जळगाव | २३,२६९ | २०,४७४ | १६,७६४ | ८१.८८ | ९ |
| १३ | नंदुरबार | ४,७८२ | ३,७८९ | २,९०९ | ७६.७७ | १६ |
| १४ | नाशिक | २८,६४९ | १५,५०२ | १०,९०७ | ७०.३६ | २९ |
| १५ | धुळे | १४,७७६ | ११,६४२ | ७,७७४ | ६६.७८ | ३१ |
| **नाशिक विभाग** | | **१,०४,७३०** | **८३,६७४** | **६५,९७०** | **७८.८४** | **३** |
| १६ | वर्धा | ९,५६९ | ८,५६८ | ७,५०१ | ८७.५५ | ४ |
| १७ | गोंदिया | १४,४८० | १३,५४१ | ११,०८१ | ८१.८३ | ११ |
| १८ | गडचिरोली | ८,८८० | ८,०३६ | ६,४३८ | ८०.११ | १३ |
| १९ | चंद्रपूर | २६,४२७ | २२,९६२ | १७,१७० | ७४.७८ | १९ |
| २० | भंडारा | १५,३९० | १४,१०९ | १०,३०८ | ७३.०६ | २४ |
| २१ | नागपूर | २०,५३९ | १३,४३५ | ९,५४८ | ७१.०७ | २७ |
| **नागपूर विभाग** | | **९५,२८५** | **८०,६५१** | **६२,०४६** | **७६.९३** | **४** |
| २२ | वाशिम | ३१,८४७ | १२,६९९ | १०,४१६ | ८२.०२ | ८ |
| २३ | यवतमाळ | २४,२८२ | २०,१०३ | १४,९५० | ७४.३७ | २० |
| २४ | अकोला | २९,५९२ | २८,८७६ | २१,२२५ | ७३.५० | २२ |
| २५ | अमरावती | २३,४५९ | २१,२२४ | १५,४०० | ७२.५६ | २५ |
| २६ | बुलढाणा | २८,६७९ | २५,३८६ | १७,३२३ | ६८.२४ | ३० |
| **अमरावती विभाग** | | **१,३७,८५९** | **१,०८,२८८** | **७९,३१४** | **७३.२४** | **५** |
| २७ | बीड | ३६,७३५ | ३०,०११ | २२,९६६ | ७६.५३ | १७ |
| २८ | लातूर | ३९,०४४ | ३४,३५७ | २६,२७० | ७६.४६ | १८ |
| २९ | धाराशिव | २२,५१७ | १९,१०८ | १४,०८२ | ७३.७० | २१ |
| ३० | छत्रपती संभाजी नगर | ३५,९८७ | २८,६०२ | २०,३७५ | ७१.२४ | २६ |
| ३१ | नांदेड | ३३,६०० | २५,३०० | १७,८१४ | ७०.४१ | २८ |
| ३२ | परभणी | २८,३३१ | २३,५६० | १५,७२३ | ६६.७४ | ३२ |
| ३३ | हिंगोली | २२,८६६ | १८,३०० | ११,९१८ | ६५.१३ | ३३ |
| ३४ | जालना | ४२,५७७ | ३१,७७५ | १६,७७२ | ५२.७८ | ३४ |
| **छत्रपती संभाजी नगर विभाग** | | **२,६१,६५७** | **२,११,०१३** | **१,४५,९२०** | **६९.१५** | **६** |
| **एकूण** | | **६,९०,६९०** | **५,६७,२७९** | **४,२२,८४१** | **७४.५४** | |

# शबरी आवास योजना

## संचित प्रगती अहवाल - ३१ मार्च, २०२५

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सिंधुदुर्ग | ४३ | २९ | २९ | १००.०० | २ |
| २ | रत्नागिरी | ३४० | २५४ | २५३ | ९९.६१ | ३ |
| ३ | पालघर | १४,३८५ | १४,३५१ | १२,५१० | ८७.१७ | ६ |
| ४ | रायगड | ६,६१० | ६,४७३ | ५,४१६ | ८३.६७ | १० |
| ५ | ठाणे | ५,४३० | ५,४०८ | ३,०८७ | ५७.०८ | २७ |
| | कोकण विभाग | २६,८०८ | २६,५१५ | २१,२९५ | ८०.३१ | १ |
| ६ | कोल्हापूर | ६० | २५ | २५ | १००.०० | १ |
| ७ | सातारा | १९७ | १९४ | १९१ | ९८.४५ | ४ |
| ८ | सोलापूर | ८९४ | ६९० | ६१९ | ८९.७१ | ५ |
| ९ | सांगली | ८० | ५० | ४३ | ८६.०० | ९ |
| १० | पुणे | ६,७३६ | ६,४१२ | ४,२५६ | ६६.३८ | १९ |
| | पुणे विभाग | ७,९६७ | ७,३७१ | ५,१३४ | ६९.६५ | २ |
| ११ | गोंदिया | ५,५९९ | ५,५८४ | ४,८३२ | ८६.५३ | ८ |
| १२ | वर्धा | ६,६९२ | ५,६९१ | ४,५३३ | ७९.६५ | ११ |
| १३ | गडचिरोली | १०,९५१ | १०,६५० | ८,१०३ | ७६.०८ | १२ |
| १४ | भंडारा | ६,३३६ | ६,३०२ | ४,७६३ | ७५.५८ | १३ |
| १५ | नागपूर | १३,१८८ | ११,९५१ | ६,६७२ | ५५.८३ | २८ |
| १६ | चंद्रपूर | २४,४३२ | २१,४१५ | ११,६३९ | ५४.३५ | २९ |
| | नागपूर विभाग | ६७,१९८ | ६१,५९३ | ४०,५४२ | ६५.८२ | ३ |
| १७ | अकोला | ५,८१५ | ५,२५७ | ३,८५३ | ७३.२९ | १४ |
| १८ | वाशिम | ३,४७० | २,८२२ | १,९६४ | ६९.६० | १६ |
| १९ | यवतमाळ | १४,३२४ | १४,३०२ | ९,०४६ | ६३.२५ | २१ |
| २० | अमरावती | १५,२३५ | १५,२०५ | ८,७२४ | ५७.३८ | २६ |
| २१ | बुलढाणा | ४,१९१ | ३,१८२ | १,६७४ | ५२.६१ | ३० |
| | अमरावती विभाग | ४३,०३५ | ४०,७६८ | २५,२६१ | ६१.९६ | ४ |
| २२ | लातूर | १,५३८ | ६३८ | ५५६ | ८७.१५ | ७ |
| २३ | बीड | २,२३० | १,१७३ | ७९५ | ६७.७७ | १७ |
| २४ | धाराशिव | ५४९ | ४८४ | ३२७ | ६७.५६ | १८ |
| २५ | हिंगोली | १८,०३६ | १३,५५४ | ८,५६१ | ६३.१६ | २२ |
| २६ | छत्रपती संभाजी नगर | ७,७८७ | ६,३१७ | ३,८१० | ६०.३१ | २३ |
| २७ | जालना | २,९५६ | १,३९२ | ८२२ | ५९.०५ | २५ |
| २८ | परभणी | ३,८८७ | ३,२३२ | १,३८५ | ४२.८५ | ३३ |
| २९ | नांदेड | ८,१४१ | ३,८३७ | १,५०६ | ३९.२५ | ३४ |
| | छत्रपती संभाजी नगर विभाग | ४५,१२४ | ३०,६२७ | १७,७६२ | ५७.९९ | ५ |
| ३० | अहमदनगर | ९,१५७ | ८,८५७ | ६,३६१ | ७१.८२ | १५ |
| ३१ | जळगाव | १४,६३२ | १४,५६४ | ९,५३९ | ६५.५० | २० |
| ३२ | नंदुरबार | ४७,०४६ | २१,४२७ | १२,६७८ | ५९.१७ | २४ |
| ३३ | नाशिक | ३६,५१६ | ३२,२७६ | १६,३६२ | ५०.६९ | ३१ |
| ३४ | धुळे | २७,४८५ | २२,०८७ | ११,०२६ | ४९.९२ | ३२ |
| | नाशिक विभाग | १,३४,८३६ | ९९,२११ | ५५,९६६ | ५६.४१ | ६ |
| | एकूण | ३,२४,९६८ | २,६६,०८५ | १,६५,९६० | ६२.३७ | |

# पारधी आवास योजना

## संचित प्रगती अहवाल - ३१ मार्च, २०२५

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | धुळे | ४३२ | ४३२ | ४२१ | ९७.४५ | ८ |
| २ | जळगाव | ५७० | ५६९ | ५३९ | ९४.७३ | १२ |
| ३ | अहमदनगर | १९८ | १९८ | १८४ | ९२.९३ | १६ |
| ४ | नाशिक | १४३ | १३७ | ११६ | ८४.६७ | २२ |
| ५ | नंदुरबार | १० | ० | ० | ०.०० | २९ |
| **नाशिक विभाग** | | **१,३५३** | **१,३३६** | **१,२६०** | **९४.३१** | **१** |
| ६ | वाशिम | ६४ | ६४ | ६४ | १००.०० | ७ |
| ७ | अकोला | ३७३ | ३७३ | ३६२ | ९७.०५ | ९ |
| ८ | बुलढाणा | ३७१ | ३७१ | ३५७ | ९६.२३ | ११ |
| ९ | अमरावती | ४४४ | ४४४ | ४२० | ९४.५९ | १३ |
| १० | यवतमाळ | ५९४ | ५९४ | ५१८ | ८७.२१ | २० |
| **अमरावती विभाग** | | **१,८४६** | **१,८४६** | **१,७२१** | **९३.२३** | **२** |
| ११ | हिंगोली | ३५ | ३५ | ३५ | १००.०० | १ |
| १२ | नांदेड | ५० | ४२ | ४२ | १००.०० | ३ |
| १३ | परभणी | ५६ | ५६ | ५६ | १००.०० | ४ |
| १४ | जालना | ३८ | ३६ | ३४ | ९४.४४ | १४ |
| १५ | बीड | ९२ | ८३ | ७८ | ९३.९८ | १५ |
| १६ | छत्रपती संभाजी नगर | ५७ | ५१ | ४६ | ९०.२० | १८ |
| १७ | धाराशिव | २४७ | २४७ | २१० | ८५.०२ | २१ |
| १८ | लातूर | १७ | १७ | १३ | ७६.४७ | २४ |
| **छत्रपती संभाजी नगर विभाग** | | **५९२** | **५६७** | **५१४** | **९०.६५** | **३** |
| १९ | वर्धा | ५० | ५० | ५० | १००.०० | ६ |
| २० | नागपूर | ४८ | ४८ | ४४ | ९१.६७ | १७ |
| २१ | चंद्रपूर | ३५ | ३२ | २३ | ७१.८८ | २५ |
| **नागपूर विभाग** | | **१३३** | **१३०** | **११७** | **९०.००** | **४** |
| २२ | कोल्हापूर | ७ | ७ | ७ | १००.०० | २ |
| २३ | सातारा | २४ | २४ | २४ | १००.०० | ५ |
| २४ | सोलापूर | २३१ | २०२ | १९५ | ९६.५३ | १० |
| २५ | सांगली | ३८ | २६ | २३ | ८८.४६ | १९ |
| २६ | पुणे | १८८ | १७४ | १३८ | ७९.३१ | २३ |
| **पुणे विभाग** | | **४८८** | **४३३** | **३८७** | **८९.३८** | **५** |
| २७ | रायगड | २ | ० | ० | ०.०० | ३१ |
| २८ | रत्नागिरी | १ | ० | ० | ०.०० | ३२ |
| **कोकण विभाग** | | **३** | **०** | **०** | **०.००** | **६** |
| **एकूण** | | **४,४१५** | **४,३१२** | **३,९९९** | **९२.७४** | |

# आदिम आवास योजना

## संचित प्रगती अहवाल - ३१ मार्च, २०२५

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सिंधुदुर्ग | ६६ | ५० | ५० | १००.०० | १ |
| २ | पालघर | १,१३१ | १,१२८ | १,१०३ | ९७.७८ | २ |
| ३ | रायगड | १,३९४ | १,३९१ | १,३४० | ९६.३३ | ३ |
| ४ | ठाणे | १,५७८ | १,५७५ | १,५०७ | ९५.६८ | ४ |
| ५ | रत्नागिरी | ११ | ११ | १० | ९०.९१ | ६ |
| कोकण विभाग | | ४,१८० | ४,१५५ | ४,०१० | ९६.५१ | १ |
| ६ | गडचिरोली | १,७७८ | १,७५२ | १,६२५ | ९२.७५ | ५ |
| ७ | चंद्रपूर | ७२३ | ६६७ | ५३९ | ८०.८१ | ७ |
| ८ | वर्धा | ३९६ | ३९६ | २८९ | ७२.९८ | १० |
| नागपूर विभाग | | २,८९७ | २,८१५ | २,४५३ | ८७.१४ | २ |
| ९ | नांदेड | ४१९ | १९१ | १५० | ७८.५३ | ८ |
| छत्रपती संभाजी नगर विभाग | | ४१९ | १९१ | १५० | ७८.५३ | ३ |
| १० | यवतमाळ | ४,७८४ | ४,६८८ | ३,५४४ | ७५.६० | ९ |
| अमरावती विभाग | | ४,७८४ | ४,६८८ | ३,५४४ | ७५.६० | ४ |
| ११ | नाशिक | ९८ | ३७ | २३ | ६२.१६ | ११ |
| नाशिक विभाग | | ९८ | ३७ | २३ | ६२.१६ | ५ |
| १२ | पुणे | ७५ | ७१ | ३८ | ५३.५२ | १२ |
| पुणे विभाग | | ७५ | ७१ | ३८ | ५३.५२ | ६ |
| एकूण | | १२,४५३ | ११,९५७ | १०,२१८ | ८५.४६ | |

# प्रधानमंत्री-जनजाती आदिवासी न्याय महाअभियान

## संचित प्रगती अहवाल - ३१ मार्च, २०२५

| अ.क्र. | जिल्हा | एकूण कुटूंबाचे सर्वेक्षण | पात्र | नोंदणी | मंजूरी | पुर्ण घरकुले | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | नांदेड | २४८ | १९३ | १९३ | १९३ | १४५ | ७५.१३ | २ |
| छत्रपती संभाजी नगर विभाग | | २४८ | १९३ | १९३ | १९३ | १४५ | ७५.१३ | १ |
| २ | सातारा | ८६४ | ७०५ | ७०० | २५१ | २५ | ९.९६ | ५ |
| ३ | पुणे | २६४४ | २२४१ | १६०९ | १७६ | १७ | ९.६६ | ७ |
| ४ | कोल्हापूर | २६ | ११ | ११ | १० | ० | ०.०० | १५ |
| पुणे विभाग | | ३५३४ | २९५७ | २३२० | ४३७ | ४२ | ९.६१ | २ |
| ५ | रत्नागिरी | १०४५ | ६०० | ५८२ | ४४० | ९१ | २०.६८ | ३ |
| ६ | रायगड | १८५७७ | १२१९४ | ११८०७ | ११४२४ | १२९६ | ११.३४ | ४ |
| ७ | पालघर | ११७३९ | १०९७३ | १०१४० | ७८२६ | ७४१ | ९.४७ | ८ |
| ८ | ठाणे | १३३७५ | १२९७६ | १०९९२ | ९२९७ | ११८ | १.२७ | १४ |
| ९ | सिंधुदुर्ग | १७५ | ५२ | ५२ | ७ | ० | ०.०० | १६ |
| कोकण विभाग | | ४४९११ | ३६७९५ | ३३५७३ | २८९९४ | २२४६ | ७.७५ | ३ |
| १० | अमरावती | ३३ | २१ | २१ | २१ | २० | ९५.२४ | १ |
| ११ | यवतमाळ | १००२६ | ८९१४ | ५९५६ | ४८८५ | ३५३ | ७.२३ | १० |
| अमरावती विभाग | | १००५९ | ८९३५ | ५९७७ | ४९०६ | ३७३ | ७.६० | ४ |
| १२ | नाशिक | ३५४२ | २८७७ | २४६९ | १८४३ | १४१ | ७.६५ | ९ |
| १३ | अहमदनगर | ९५ | ७५ | ७५ | ७४ | ३ | ४.०५ | १३ |
| नाशिक विभाग | | ३६३७ | २९५२ | २५४४ | १९१७ | १४४ | ७.५१ | ५ |
| १४ | चंद्रपूर | ८२५ | ४७७ | ४५२ | ३४७ | ३४ | ९.८० | ६ |
| १५ | वर्धा | ६९५ | ४६५ | ३८५ | ३३१ | १६ | ४.८३ | ११ |
| १६ | गडचिरोली | ८३२१ | ७५७३ | ६८५४ | ६५९१ | ३१२ | ४.७३ | १२ |
| नागपूर विभाग | | ९८४१ | ८५१५ | ७६९१ | ७२६९ | ३६२ | ४.९८ | ६ |
| एकूण | | ७२२३० | ६०३४७ | ५२२९८ | ४३७१६ | ३३१२ | ७.५८ | |

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजना

## संचित प्रगती अहवाल - ३१ मार्च, २०२५

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | वाशिम | ४१ | ४१ | ४१ | १००.०० | १ |
| २ | बुलढाणा | ८६ | ८१ | ५८ | ७१.६० | ३ |
| अमरावती विभाग | | १२७ | १२२ | ९९ | ८१.१५ | १ |
| ३ | जळगाव | १९२ | १८६ | ८८ | ४७.३१ | ७ |
| ४ | अहमदनगर | १५८ | १५५ | ४१ | २६.४५ | ८ |
| ५ | नंदुरबार | २ | २ | ० | ०.०० | २२ |
| नाशिक विभाग | | ३५२ | ३४३ | १२९ | ३७.६१ | २ |
| ६ | रायगड | १२ | १२ | ६ | ५०.०० | ६ |
| ७ | सिंधुदुर्ग | २१ | २१ | १ | ४.७६ | १३ |
| ८ | रत्नागिरी | ० | ० | ० | ०.०० | २५ |
| ९ | ठाणे | ० | ० | ० | ०.०० | २६ |
| कोकण विभाग | | ३३ | ३३ | ७ | २१.२१ | ३ |
| ११ | सातारा | २७३ | २१३ | १२३ | ५७.७५ | ४ |
| १२ | कोल्हापूर | ५२५ | ५२५ | २७५ | ५२.३८ | ५ |
| १३ | सोलापूर | २,०४५ | १,८६१ | ३६ | १.९३ | १६ |
| १४ | सांगली | ८४४ | ६६१ | ३ | ०.४५ | १७ |
| १५ | पुणे | १,२३६ | २८९ | ० | ०.०० | २४ |
| पुणे विभाग | | ४.९२३ | ३.५४९ | ४३७ | १२.३१ | ४ |
| १६ | भंडारा | २२ | २१ | १९ | ९०.४८ | २ |
| १७ | वर्धा | ७४५ | ४४४ | ४० | ९.०१ | ११ |
| १८ | गोंदिया | १५ | १४ | १ | ७.१४ | १२ |
| १९ | चंद्रपूर | ७२९ | ११० | ५ | ४.५५ | १४ |
| नागपूर विभाग | | १.५११ | ५८९ | ६५ | ११.०४ | ५ |
| २० | लातूर | २,४४५ | १,१०० | २४६ | २२.३६ | ९ |
| २१ | परभणी | ४,४०३ | ४,००३ | ४०१ | १०.०२ | १० |
| २२ | जालना | ७,०४८ | ५,८४७ | १६४ | २.८० | १५ |
| २३ | छत्रपती संभाजी नगर | २,८५९ | १,८३४ | ७ | ०.३८ | १८ |
| २४ | बीड | ५,७०० | ० | ० | ०.०० | १९ |
| २५ | नांदेड | ५ | ५ | ० | ०.०० | २१ |
| छत्रपती संभाजी नगर विभाग | | २२.४६० | १२.७८९ | ८१८ | ६.४० | ६ |
| एकूण | | २९.४०६ | १७.४२५ | १.५५५ | ८.९२ | |

# यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना

## संचित प्रगती अहवाल - ३१ मार्च, २०२५

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | रत्नागिरी | १५० | ११९ | ९० | ७५.६३ | ३ |
| कोकण विभाग | | १५० | ११९ | ९० | ७५.६३ | १ |
| २ | जळगाव | १,०४९ | ९९४ | ५३१ | ५३.४२ | ८ |
| ३ | धुळे | १५२ | १४५ | ६९ | ४७.५९ | ९ |
| ४ | अहमदनगर | २० | २० | ० | ०.०० | २० |
| नाशिक विभाग | | १.२२१ | १.१५९ | ६०० | ५१.७७ | २ |
| ५ | अमरावती | ५०७ | ४७६ | ३४६ | ७२.६९ | ४ |
| ६ | यवतमाळ | ६,१७८ | ५,३९१ | २,२२१ | ४१.२० | ११ |
| ७ | वाशिम | ० | ० | ० | ०.०० | २४ |
| अमरावती विभाग | | ६.६८५ | ५.८६७ | २.५६७ | ४३.७५ | ३ |
| ८ | गोंदिया | १,१६९ | १,१३५ | ७३२ | ६४.४९ | ६ |
| ९ | भंडारा | ३,२८४ | ३,१४० | १,६९२ | ५३.८९ | ७ |
| १० | चंद्रपूर | ११,४०८ | ९,६६७ | ३,३०८ | ३४.२२ | १२ |
| ११ | वर्धा | ४०० | ३२४ | ३८ | ११.७३ | १५ |
| १२ | नागपूर | ७८० | ५५२ | ३० | ५.४३ | १८ |
| नागपूर विभाग | | १७.०४१ | १४.८१८ | ५.८०० | ३९.१४ | ४ |
| १३ | कोल्हापूर | ६५ | ६४ | ६० | ९३.७५ | १ |
| १४ | सातारा | २२६ | २१८ | १७२ | ७८.९० | २ |
| १५ | सोलापूर | १४ | १४ | १० | ७१.४३ | ५ |
| १६ | सांगली | १,०६१ | ८३६ | ९८ | ११.७२ | १६ |
| १७ | पुणे | २० | ० | ० | ०.०० | २३ |
| पुणे विभाग | | १.३८६ | १.१३२ | ३४० | ३०.०४ | ५ |
| १८ | परभणी | ६५२ | ४६० | २१० | ४५.६५ | १० |
| १९ | धाराशिव | ३,७७२ | २,७४७ | ८५० | ३०.९४ | १३ |
| २० | जालना | ९,५११ | ८,७७४ | १,०३० | ११.७४ | १४ |
| २१ | लातूर | ३,९८५ | १,८४३ | १६२ | ८.७९ | १७ |
| २२ | छत्रपती संभाजी नगर | १,५४६ | ७०६ | ४ | ०.५७ | १९ |
| २३ | नांदेड | १ | १ | ० | ०.०० | २१ |
| छत्रपती संभाजी नगर विभाग | | १९.४६६ | १४.५३० | २.२५६ | १५.५३ | ६ |
| एकूण | | ४५.९४९ | ३७.६२५ | ११.६५३ | ३०.९७ | |

# मोदी आवास घरकुल योजना

## संचित प्रगती अहवाल - ३१ मार्च, २०२५

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | गोंदिया | १४,४२९ | १४,४२९ | १२,०९० | ८३.७९ | १ |
| २ | गडचिरोली | ६,५४८ | ६,५४८ | ४,९१२ | ७५.०२ | २ |
| ३ | वर्धा | ४,९६५ | ४,९६५ | ३,४९५ | ७०.३९ | ३ |
| ४ | भंडारा | ११,०३३ | ११,०३३ | ६,६८६ | ६०.६० | ७ |
| ५ | नागपूर | ६,७४७ | ६,७४० | ३,८१६ | ५६.६२ | १० |
| ६ | चंद्रपूर | १०,८७४ | १०,८६९ | ५,९८४ | ५५.०६ | ११ |
| | **नागपूर विभाग** | **५४,५९६** | **५४,५८४** | **३६,९८३** | **६७.७५** | **१** |
| ७ | रत्नागिरी | ६,३५६ | ६,३५३ | ३,८७२ | ६०.९५ | ६ |
| ८ | सिंधुदुर्ग | १,३०८ | १,३०८ | ७५६ | ५७.८० | ९ |
| ९ | पालघर | ४५८ | ४५८ | २३२ | ५०.६६ | १४ |
| १० | रायगड | २,४५६ | २,४१७ | १,१६२ | ४८.०८ | १६ |
| ११ | ठाणे | २,५३८ | २,५३८ | १,०७६ | ४२.४० | १८ |
| | **कोकण विभाग** | **१३,११६** | **१३,०७४** | **७,०९८** | **५४.२९** | **२** |
| १२ | अकोला | ७,३५३ | ७,३५३ | ४,९२९ | ६७.०३ | ४ |
| १३ | अमरावती | १४,१७८ | १४,१७८ | ८,३४६ | ५८.८७ | ८ |
| १४ | वाशिम | १२,४५५ | १२,४५५ | ६,७५२ | ५४.२१ | १२ |
| १५ | यवतमाळ | २९,९९९ | २९,९९९ | १४,६१३ | ४८.७१ | १५ |
| १६ | बुलढाणा | १७,०५५ | १७,०५४ | ७,१५० | ४१.९३ | २० |
| | **अमरावती विभाग** | **८१,०४०** | **८१,०३९** | **४१,७९०** | **५१.५७** | **३** |
| १७ | सातारा | १,७७७ | १,७७७ | १,१७५ | ६६.१२ | ५ |
| १८ | सांगली | १,९५८ | १,९५८ | १,०१३ | ५१.७४ | १३ |
| १९ | कोल्हापूर | २,०३१ | २,०१४ | ८४६ | ४२.०१ | १९ |
| २० | सोलापूर | ११,०१९ | ११,०१७ | ३,७८८ | ३४.३८ | २४ |
| २१ | पुणे | १,५२१ | १,५१८ | ४१४ | २७.२७ | ३२ |
| | **पुणे विभाग** | **१८,३०६** | **१८,२८४** | **७,२३६** | **३९.५८** | **४** |
| २२ | छत्रपती संभाजी नगर | ५,८१२ | ५,४६० | २,६१९ | ४७.९७ | १७ |
| २३ | धाराशिव | २,२७४ | २,२७४ | ९१८ | ४०.३७ | २१ |
| २४ | लातूर | ६,३१८ | ६,३१८ | २,३५४ | ३७.२६ | २२ |
| २५ | बीड | १६,०४१ | १६,०३९ | ५,४३६ | ३३.८९ | २५ |
| २६ | हिंगोली | ३,३५४ | ३,३५३ | १,११९ | ३३.३७ | २६ |
| २७ | नांदेड | २३,५९८ | २३,५९६ | ७,७७५ | ३२.९५ | २७ |
| २८ | जालना | ८,४९६ | ८,३५४ | २,७१८ | ३२.५४ | २९ |
| २९ | परभणी | १३,५९६ | १३,५९५ | ४,०२२ | २९.५८ | ३१ |
| | **छत्रपती संभाजी नगर विभाग** | **७९,४८९** | **७८,९८९** | **२६,९६१** | **३४.१३** | **५** |
| ३० | जळगाव | २९,५३१ | २९,५२५ | १०,५८७ | ३५.८६ | २३ |
| ३१ | अहमदनगर | ४,३५६ | ४,३३६ | १,४२७ | ३२.९१ | २८ |
| ३२ | नाशिक | ६,९८१ | ६,९८१ | २,११६ | ३०.३१ | ३० |
| ३३ | धुळे | ९,७०९ | ९,७०९ | २,२५१ | २३.१८ | ३३ |
| ३४ | नंदुरबार | २,८७६ | २,८७६ | ५०४ | १७.५२ | ३४ |
| | **नाशिक विभाग** | **५३,४५३** | **५३,४२७** | **१६,८८५** | **३१.६०** | **६** |
| | **एकूण** | **३,००,०००** | **२,९९,३९७** | **१,३६,९५३** | **४५.७४** | |

# महा आवास अभियानामुळे घरकुलाची स्वप्नपुर्ती

डोंगरगाव हे गाव विदर्भातील चंद्रपुर जिल्ह्यामध्ये राजुरा तालुक्यात आहे. या गावची एकूण लोकसंख्या २,१९२ असून या गावात एकूण ५०४ कुटुंब वास्तव्यास आहे. या गावात विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत एकूण १५ घरकुल लाभार्थी आहेत.डोंगरगावात २५ वर्षे जुने धरण असून चिंचाळा, केळझर डोंगरगाव, लाईनगुडा, मुंडीगेट या गावांचा समावेश आहे.

अशा या डोंगरगाव ग्रामपंचायती अंतर्गत लाईनगुडा या गावात श्री.माणिक मडावी वास्तव्यास आहेत. श्री.माणिक मडावी यांचे आधीचे घर हे कुडा मातीचे होते. घराची परिस्थिती अत्यंत धोकादायक असून त्यांचे जुने घर मोडकळीस आले होते. त्यांनी कित्येकदा घराची दुरूस्ती केली. परंतु पावसाळा आला की, त्यांच्या घराची परिस्थिती जशीच्या तशी व्हायची. पक्के घर बांधायचे तर त्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत बेताची होती. त्यामुळे ते कायम चिंताग्रस्त होते.

अशातच श्री.माणिक मडावी यांना शासनाच्या महा आवास अभियानाबाबत ग्रामस्थांनी माहिती दिली. अधिक माहिती घेण्यासाठी त्यांनी थेट ग्रामपंचायत कार्यालयाकडे धाव घेतली. ग्रामपंचायत कार्यालयात त्यांना शासनाच्या विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांबाबत माहिती दिली. तसेच या योजनेच्या पात्रतेचे निकष व कागदपत्रांबाबत सविस्तर सांगण्यात आले. त्यानुसार श्री.माणिक मडावी यांनी कागदपत्राची जुळवाजुळव करून ग्रामपंचायत कार्यालयात दिले.

श्री.माणिक मडावी यांच्या कागदपत्राची तपासणी करून ग्रामपंचायत कार्यालयाने आदिम आवास योजना मधून त्यांचा प्रस्ताव तयार केला. राज्यात महा आवास अभियान सुरू असल्याने त्यांचा प्रस्ताव मंजुर होवून त्यांना सन २०२१-२२ मध्ये आदिम आवास योजने मधून घरकुल मंजूर झाले. घरकुल मंजुरी नंतर त्यांना पहिला हप्ता त्यांच्या बँक खाती जमा झाला.

श्री.माणिक मडावी यांना पहिला हप्ता मिळताच ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांनी घराचे ले-आऊट देवून घरकुल बांधकामास सुरूवात केली. श्री.माणिक मडावी यांना घराची अत्यंत गरज असल्याने त्यांने घर बांधकामात खुप कष्ट घेतले. तसेच त्यांनी जवळची जमा राशीही घर बांधकामाकरीता लावली, कारण त्यांना हे चांगल्या प्रकारे माहिती होतं की, घर एकदाचं होतं. घरकुल बांधकामाच्या टप्प्यानुसार श्री.माणिक मडावी यांना त्यांच्या घराचे सर्व हप्ते वेळेवर मिळाले. त्यामुळे त्यांनी विनाविलंब घरकुलाचे बांधकाम पूर्ण केले. याकामी त्यांना ग्रामीण गृहनिर्माण अभियंता श्री. लारेब खान यांनी वेळोवेळी मार्गदर्शन केले. कित्येक वर्षांपासून मनी बाळगलेले पक्क्या घराचे स्वप्न अखेर श्री.माणिक मडावी यांचे पुर्ण झाले. आजे ते या घरात आनंदाने व सुख समाधानाने राहत आहेत.

त्यांचे घरकुल बांधकाम सुरू असतांना पंचायत समिती राजुराचे गट विकास अधिकारी श्री.हेमंत भिंगारदेवे, विस्तार अधिकारी श्रीमती प्रीती वेल्हेकर, ग्रामपंचायत अधिकारी श्री. साखरे व ग्रामीण गृहनिर्माण अभियंता श्री. लारेब मंजूर खान यांचे मार्गदर्शन व सहकार्याने लाभले त्याकरीता श्री.माणिक मडावी यांनी त्यांचे आभार मानले आहे.

घरकुलासह श्री.माणिक मडावी यांना पक्के रस्ते, भूमीगत गटार व्यवस्था, पथ दिवे, सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन अशा विविध नागरी मुलभूत सुविधा ग्रामपंचायतीने उपलब्ध करून दिल्यात.

श्री.माणिक मडावी यांना शासकीय योजनांच्या कृतीसंगमातून महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने मधून शोष खड्ड्यांचे कामे मिळाले. स्वच्छ भारत मिशन(ग्रामीण) मधून शौचालय मिळाले. तसेच उज्वला योजने मधून विद्युत जोडणी मिळाली. त्यामुळे त्यांचे जीवनमान उंचावले असून सर्व सुख सोयीयुक्त घरकुलामुळे त्यांची गावात प्रतिष्ठा वाढली आहे.





# हाऊसिंग कॉलनीमुळे भुमिहीन लाभार्थ्यांना जागेसह घरकुलाचा लाभ

नांदगाव खंडेश्वर हे महाराष्ट्र राज्यातील अमरावती जिल्ह्यातील तालुका आहे. खांदेश्वर मंदिर हे नांदगाव खंडेश्वरमधील सर्वात प्रसिद्ध आणि जुने ठिकाण असून हे मंदिर हेमाडपंत्यांनी बांधले होते. महाशिवरात्रीला, खांदेश्वर मंदिरात एक मेळा भरतो, जो नांदगाव खंडेश्वरच्या लोकांसाठी एक मोठा कार्यक्रम आहे. हा कार्यक्रम संपूर्ण नांदगावात ७ दिवस साजरा केला जातो.

पंचायत समिती नांदगाव खंडेश्वर अंतर्गत ग्रामपंचायत ढवळसरी येथे प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण PWL मध्ये ९४ लाभार्थी होते. त्यापैकी स्वतःची जागा उपलब्ध असलेले ३५ लाभार्थी होते. यामध्ये PWL मधील ३९ लाभार्थी भुमिहिन असल्यामुळे सन २०१६-१७ पासुन घरकुलाच्या लाभापासून वंचित होते. या सर्व लाभार्थ्यांसाठी जागा उपलब्ध करण्याकरीता ग्रामपंचायत ढवळसरी येथे उपलब्ध असलेल्या ई-वर्ग जमिनीचे प्रस्ताव २०१८ मध्ये पंचायत समिती मार्फत तहसिल कार्यालय सादर करण्यात आले होते.परंतु शासनाच्या DPR मध्ये सदर जागा औद्योगिक क्षेत्रामध्ये असल्या कारणाने या जमिनीला सहाय्यक संचालक नगर रचना यांच्याकडुन नाहरकत मिळविण्याकरीता अडचण येत होती.

या प्रस्तावाबाबत ढवळसरीचे सरपंच श्री.मलीक मुजफर अली यांनी जिल्हाधिकारी अमरावती यांचेशी चर्चा करुन ही जागा औघोगिक क्षेत्रामधुन वगळण्याकरीता विनंती केली. जिल्हाधिकारी यांनी 'सर्वासाठी घरे' अंतर्गत विशेष बाब म्हणुन ढवळसरी तसेच मोरगाव येथिल ई- वर्ग जमिन औघोगिक क्षेत्रामधुन वगळण्याकरीता त्यांच्या स्तरावरुन आदेश दिले. तदनंतर ई- वर्ग जमिनीचा प्रस्ताव सहाय्यक संचालक नगररचना तसेच इतर विभागाला नाहरकत करीता गट विकास अधिकारी पंचायत समिती, नांदगाव खंडेश्वर यांच्यामार्फत पाठविण्यात आला.



पंचायत समिती नांदगाव खंडेश्वर अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण मधुन भुमिहिन लाभार्थ्यांना मोफत जागा उपलब्ध करुन देण्याकरीता ग्रामपंचायत ढवळसरी येथिल ई-वर्ग मधुन ब व ड यादी नुसार एकुण ३९ भुमिहिन लाभार्थी होते. त्यानुसार ई-वर्ग मधुन प्रस्ताव सादर करुन उपविभागीय अधिकारी यांच्या कडुन मंजुरी घेवून प्रथमतः भुमिहिन लाभार्थ्यांना ५०० चौ.फुट जागा उपलब्ध करुन देण्यात आली. या सर्व लाभार्थ्यांना ईश्वर चिठठी व्दारे जागा देवून नमुना ८ मध्ये नोंद घेण्यात आली.

सर्व लाभार्थ्यांना जागा उपलब्ध होताच घरकुल मंजुरी बाबतची अडचण दूर झाली. त्यामळे या सर्व लाभार्थ्यांच्या घरकुलांना तात्काळ मंजुरी देण्यात आली. ग्रामपंचायत व पंचायत समितीच्या पुढाकाराने या सर्व लाभार्थ्यांच्या घरकुलाचे बांधकामास सुरुवात करण्यात आली. या सर्व लाभार्थ्यांना स्वतःच्या जागेसह पक्के घरकुल मिळाल्यामुळे लाभार्थ्यांमध्ये एक आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या सर्व भुमिहीन लाभार्थ्यांना ज्याप्रमाणे घरकुलाकरीता जागेची उपलब्धता झाली त्याचप्रमाणे कमी खर्चात दर्जेदार घरकुलांची उभारणी करण्याकरीता या लाभार्थ्यांसाठी हाऊसिंग कॉलनी उभारण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यांचा या हाऊसिंग कॉलनीला ग्रामपंचायत मार्फत पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, रस्ते, भूमीगत गटार व्यवस्था, पथ दिवे, सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन अशा विविध नागरी मुलभूत सुविधा ग्रामपंचायतीने उपलब्ध करून दिल्यात.

पंचायत समिती व ग्रामपंचायतीच्या पुढाकाराने आज सन २०१६-१७ पासून जागेअभावी घरकुलापासून वंचित असलेल्या भुमिहीन लाभार्थ्यांना जागेसह हक्काचे पक्के घरकुल मिळाले. त्याबद्दल या सर्व लाभार्थ्यांनी शासनाचे व ग्रामपंचायत पदाधिकारी व अधिकारी यांचे आभार मानले आहेत.



# पारधी समाजाच्या लाभार्थ्याला बन येथे मिळाले हक्काचे घर

बन हे गाव मराठवाड्यातील हिंगोली जिल्ह्यामधील सेनगाव तालुक्यात आहे. बन येथे आषाढी एकादशी निमित्त पारधी समाजातील लाभार्थी श्री.मनु दगडू पवार यांना राहण्यास घरकुल नसल्याने शबरी आवास योजनेचा लाभ देवून घरकुलाचे स्वप्न साकारले आहे. या घरकुलाचा गृहप्रवेश जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.संजय दैणे व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक श्री.नामदेव केंद्रे यांच्या हस्ते लाभार्थ्याला घरकुलाच्या चाव्या सुपूर्द करून करण्यात आला आहे.

सेनगाव तालुक्यातील बन येथील हलाखीची परिस्थिती असणारे व पालात राहणारे पारधी समाजातील श्री.मनु दगडू पवार यांची एक वर्षापूर्वी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची बन येथील आरोग्य उपकेंद्रांमध्ये भेट झाली. यावेळी संबंधित लाभार्थी श्री.मनु दगडू पवार यांनी मी पालामध्ये राहतो, मला घरकुल उपलब्ध करून द्यावे अशी विनंती केली होती.



जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.संजय दैणे यांनी श्री.मनु दगडू पवार यांची व्यथा ऐकल्यावर त्यांना घरकुलाचा लाभ देण्याचा निर्णय घेतला आणि त्यादृष्टीने त्यांनी सुत्र हलविण्यास सुरूवात केली. याकरीता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तातडीने संबंधित विभागाला सूचना देऊन शबरी आवास योजने अंतर्गत श्री.मनु दगडू पवार यांना घरुकल मंजुरी बाबत कार्यवाही करण्याचे आदेश दिले. त्यानुसार श्री.मनु दगडू पवार यांचा घरकुल मंजुरीचा प्रस्ताव तयार करून त्यांच्याकडून आवश्यक कागदपत्रांची पुर्तता करण्यात आली. त्यांचे बँकेत खाते उघडण्यात आले. त्यानंतर युध्दपातळीवर काम करून श्री.मनु दगडू पवार यांना शबरी आवास योजनेमधून घरकूल मंजूर करण्यात आले. श्री.मनु दगडू पवार यांना घरकुल मंजुर झाल्याची बातमी कळताचं त्यांचा आनंद गगनात मावनासा झाला.

श्री.मनु दगडू पवार यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे खुप खुप आभार मानले. श्री.मनु दगडू पवार यांनी घरकुलाचे बांधकाम अवघ्या दोन महिन्यांमध्ये पूर्ण केले. त्यांची घरकुलाबद्दलची तळमळ बघता मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.संजय दैणे यांनी सपत्नीक श्री.मनु दगडू पवार यांच्या घरकुलाला भेट देऊन त्यांचा गृहप्रवेश आषाढी एकादशीच्या शुभ मुहूर्तावर केला. या लाभार्थीला हक्काचे घरकुल मिळाल्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.संजय दैणे व जिल्हा विकास यंत्रणेचे पकल्प संचालक श्री.नामदेव केंद्रे यांनी समाधान व्यक्त केले.

श्री.मनु दगडू पवार यांच्या गृहप्रवेश कार्यक्रमा प्रसंगी जिल्हा विकास यंत्रणेचे पकल्प संचालक श्री.नामदेव केंद्रे, गट विकास अधिकारी पंचायत समिती सेनगाव श्री.माधव कोकाटे, विस्तार अधिकारी सांख्यिकी श्री.व्ही. बी. देशमुख, डॉ. इंदिरा जामने, ग्रामसेवक श्री.सुरेश काळे, सरपंच श्रीमती अर्चना शेजुळ डॉ. दिनेश नागरे, उपसरपंच श्रीमती ज्योती गजानन वाघ, श्री.एकनाथ वाघ, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता श्री.कृष्णा खिंडरे, श्री.अटकोरे, डेटा एन्ट्री ऑपरेटर श्री.युवराज देशमुख, ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ आदींची उपस्थिती होती.

शबरी आवास योजनेचे लामार्थी श्री.मनु दगडू पवार यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले.






# ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रात नाविन्यपूर्ण उपक्रमांची अंमलबजावणी

अहिल्यानगर नाशिक विभागातील जिल्हा असून या जिल्ह्यांतर्गत अकोले, जामखेड, कर्जत, कोपरगाव, अहिल्यानगर, नेवासा, पारनेर, पाथर्डी, राहाता, राहुरी, संगमनेर, शेवगाव, श्रीगोंदा, श्रीरामपुर या १४ तालुक्यांचा समावेश आहे. अहिल्यानगर जिल्ह्याने ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रात अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम राबवित लाभार्थ्यांचे घरकुलाचे स्वप्न पूर्ण केले.

घरकुलास पात्र असलेल्या घरकुल बांधकामास जागा नसलेल्या भुमिहिन लाभार्थ्यांसाठी अहिल्यानगर जिल्ह्यात 'भुमिशोध अभियान' राबवुन गावामध्ये असलेल्या महाराष्ट्र शासन, गावठाण, इतर विभागाची खाजगी जागेचा शोध घेऊन भुमिहीन लाभार्थ्यांना भुखंड वाटप करणे, अतिक्रमण नियमानुकुल करणे व पंडीत दिनदयाळ घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेतुन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देणे यासारखे उपक्रम राबवून जिल्ह्यात एकुण १४७० भुमिहीन लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी जागा उपलब्ध करुन दिली.



घरकुल मंजुर लाभार्थांना प्रथम, व्दितीय व तृतीय हप्त्याचे अनुदान वेळेत वितरण करण्यात आले. अपुर्ण असलेली घरकुले पुर्ण करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तालुकानिहाय ग्रामसेवक, विस्तार अधिकारी, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, ऑपरेटर यांच्या दर १५ दिवसाला आढावा बैठक घेतल्या. त्याचप्रमाणे जास्त उद्दिष्ट असलेल्या गावांना प्रत्यक्ष भेटी देऊन लाभार्थ्यांना घरकुले पुर्ण करण्यासाठी प्रोत्साहित करण्यात आले. जे लाभार्थी अनुदान घेऊनही घरकुलाचे बांधकाम पुर्ण करत नव्हते अशा लाभार्थींना पोलीस विभागाची मदत घेऊन घरकुले पुर्ण करण्यासाठी प्रवृत्त केले.



घरकुल बांधकामासाठी लाभार्थांना ५ ब्रास वाळु उपलब्ध होणेकामी महसुल विभागाशी समन्वय साधून वाळु डेपोमधुन मोफत वाळु उपलब्ध करुन देण्यात आली. राज्यात आजपर्यंत राबविण्यात आलेल्या सर्व महा आवास अभियानामध्ये अहिल्यानगर जिल्ह्याने नेहमीच चांगली कामगिरी केली आहे. अमृत महा आवास अभियानांतर्गत प्रधानमंत्री आवास योजनेमध्ये एकुण १५,३२२ व राज्य पुरस्कृत आवास योजनेंतर्गत ५,०४२ असे एकुण २०,३६४ घरकुले अभियान काळात पुर्ण करण्यात आली.

अहिल्यानगर जिल्हयात एकुण १० गृहसंकुले उभारुन ३०० लाभार्थींना RCC घरकुलांचा लाभ देण्यात आलेला आहे.जिल्ह्यात उभारण्यात आलेल्या गृहसंकुल प्रकल्पास शासकीय योजनांच्या कृतीसंगमातून लाभार्थ्यांना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने मधून मनुष्य दिवस रोजगार, स्वच्छ भारत मिशन मधून शौचालयासाठी अनुदान, जल जीवन मिशन मधून नळाने पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, प्रधानमंत्री उज्वला योजना मधून गॅस जोडणी, सौभाग्य योजने मधून विद्युत जोडणी व राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान मधून उपजिविकेचे साधन उपलब्ध करून देण्यात आले.

त्याचप्रमाणे १४ वित्त आयोग, १५ वित्त आयोग, ठक्कर बाप्पा योजना, इ. मधून लाभार्थांना मुलभूत नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या. तसेच रेन फॉर फांऊडेशन, पुणे या NGO मार्फत वांगदरी गृहसंकुल प्रकल्पास एकुण २२.५० लक्ष अर्थसहाय्य करण्यात आले आहे.



# ग्रामीण गवंडी प्रशिक्षणामुळे अर्थसहाय्यासह रोजगाराची उपलब्धता

लक्ष्मी दहिवडी ग्रामपंचायत सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा तालुक्यात आहे. या ग्रामपंचायतीची एकूण लोकसंख्या ५६२८ इतकी असून कुटूंब संख्या १५३० आहे. या गावामध्ये विविध आवास योजनांचे एकूण १२ घरकुल लाभार्थी आहेत.

ग्रामपंचायत लक्ष्मी दहिवडी गावातील १२ लाभार्थ्यांना प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत घरकुल मंजूर झाल्यानंतर या सर्व १२ लाभार्थ्यांनी गावातील श्री. पांडूरंग रेवाप्पा सोनवले यांच्याकडून प्रत्येकी १ गुंठा जागा खरेदी केली. जागा खरेदी झाल्यानंतर पंचायत समिती बांधकाम विभाग मधील स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक व ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांच्याकडून लाईन आऊट देण्यात आले. तसेच या सर्व लाभार्थ्यांना गृहसंकुल उभारणीबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. त्यानुसार या लाभार्थ्यांनी गृहसंकुल उभारण्याचा निर्णय घेतला.

या सर्व लाभार्थांना प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत ग्रामीण गवंडी प्रशिक्षण देण्यात आले. यामुळे प्रत्येक लाभार्थीला रक्कम रू. ७८,७५०/- मंजूर करण्यात आले. या लाभार्थींना प्रशिक्षण कार्यकमात जॅकेट, हेल्मेट, मास्क, शूज, टूल बॉक्स इ. साहित्य देण्यात आले. त्यांना मिळालेल्या या अर्थसहाय्यामुळे घरकुल बांधकामास मोठी मदत झाली. तसेच ग्रामीण गवंडी प्रशिक्षणामुळे रोजगार उपलब्धीही झाली. या ग्रामीण गवंडी प्रशिक्षणामध्ये लाभार्थांना विट बांधकाम करणे, दगड बांधकाम करणे, लाईन आउट आखणे, शौचालयाची टाकी बांधणे, स्टील बार बायडिंग करणे, वळंबा, लाईन दोरी यांचा वापर करुन बांधकाम सरळ रेषेत आहे का नाही पाहणे, इ. विषयाचे प्रशिक्षण देण्यात आले. त्यामुळे या सर्व लाभार्थ्यांची गणना कुशल गवंड्यामंध्ये करण्यात आली.

ग्रामपंचायत लक्ष्मी दहिवडी येथील गृहसंकुलास पुणे विभागीय आयुक्त कार्यालयाचे उप आयुक्त (विकास) श्री. विजय मुळीक यांनी भेट देवून घरकुल लाभार्थ्यांशी संवाद साधला. यावेळी त्यांच्या सोबत जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे सहाय्यक प्रकल्प संचालक श्री.रतिलाल साळूंखे, व मंगळवेढा पंचायत समितीचे गट विकास अधिकारी श्री.शिवाजी पाटील उपस्थित होते.






आम्ही सर्व लाभार्थी भटकंती करुन रोजंदारीने कामाला जाऊन स्वत:चे पोट भरत होतो. आम्ही गेले ४० वर्षे पाला मध्ये राहत होतो. नैसर्गिक आपत्तीमध्ये ऊन,वारा, पाऊस या परिस्थितीमध्ये आम्हाला खुप हाल सोसावे लागत होते. आम्हाला शासनाने प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण अंतर्गत घरकुल मंजुर केल्यामुळे स्वत:चे हक्काचे घर मिळाले. घरकुला सोबत शासकीय योजनांच्या कृतीसंगमातून इतर योजनाचाही आम्हाला लाभ मिळाला. यामध्ये स्वच्छ भारत मिशन अंतर्गत शौचालय देण्यात आले. जल जीवन मिशन अंतर्गत नळ कनेक्शन देण्यात आले. उज्वला योजने अंतर्गत गॅस कनेक्शन देण्यात आले. बचत गटाच्या माध्यमातून महिलांना उपजिविकेचे साधन मिळाले. आज आम्ही कुटूंबासोबत आनंदात व खेळीमेळीच्या वातावरणात राहत आहे. आमचे ४० वर्षा नंतर घरकुलाचे स्वप्न आज प्रत्यक्षात साकार झाले असून याकरीता आम्ही शासनाचे आभारी आहोत. अशी प्रतिक्रिया सर्व लाभार्थ्यांनी व्यक्त केली.



# प्रधानमंत्री-जनमन योजनेमुळे आदिवासी कुटुंबांना मिळाला निवारा

लोहरे हे गाव महाराष्ट्र राज्यातील रायगड जिल्ह्यातील पोलादपूर तालुक्यात आहे. हे गाव तालुका मुख्यालय पोलादपूर पासून १५ किमी अंतरावर आणि जिल्हा मुख्यालय अलिबागपासून १३२ किमी अंतरावर आहे. या गावाचे क्षेत्रफळ सुमारे १०१५ हेक्टर असून या गावाची एकूण लोकसंख्या २४०८ असून त्यापैकी पुरुषांची लोकसंख्या ११८४ व महिलांची लोकसंख्या १२२४ आहे. सर्व प्रमुख आर्थिक उपक्रमांसाठी लोहरे गावापासून महाड हे सर्वात जवळचे शहर असून जे सुमारे १४ किमी अंतरावर आहे.

पोलादपूर तालुक्यातील लोहारी ग्रामपंचायत नेहमीच गावाच्या विकासासाठी झटत असते. लोहारी ग्रामपंचायत हद्दितील लोहारे आदिवासी वाडी येथील आदिवासी समाज अनेक वर्षापासून कच्च्या घरांमध्ये राहत होता. या आदिवासी कुटुंबाना हक्काचा पक्का निवार देण्याचा निर्णय पंचायत समिती पोलादपूर व ग्रामपंचायत लोहारे यांनी घेतला.




त्यानुसार त्यांनी लोहारे वाडीचा सर्व्हे करून सर्व लाभार्थ्यांना आवश्यक कागदपत्राची पुर्तता करून त्यांचा घरकुलाचा प्रस्ताव तयार करून मंजुरी करता वरिष्ठ कार्यालयाकडे सादर केला. त्यानुसार प्रधानमंत्री-जनमन योजने अंतर्गत लोहारे आदिवासी वाडीतील १४ लाभार्थ्यांना घरकुल मंजूर झाले. त्यामुळे या आदिवासी समाजाला आता स्वतःचे हक्काचे चांगले



घर मिळण्याचा मार्ग मोकळा झाला.

पंचायत समिती व ग्रामपंचायतीच्या सहकार्यामुळे या १४ लाभार्थ्यांसाठी शौचालयासह घरकुलांचे बांधकाम अत्यंत अल्प कालावधीत पूर्ण करण्यात आले. त्यांना प्रधानमंत्री-जनमन योजनेमधून मिळालेल्या पक्क्या घरकुलांमुळे आदिवासी वाढीचा विकास होत असताना दिसत आहे.

लोहारे येथील आदिवासी बांधव पक्क्या घरांमध्ये राहत असल्यामुळे पंचायत समिती पोलादपूर व ग्रामपंचायत लोहारे यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. अशाप्रकारची घरकुले सर्व आदिवासी वाड्यांमध्ये बांधली तर निश्चितच आदिवासी समाज विकासाकडे वाटचाल करेल.

या लाभार्थ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी शासनाच्या विविध योजनांशी कृतीसंगम करून लाभार्थ्यांना रोजगार मिळवून देण्यासाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, शौचालयासाठी स्वच्छ भारत मिशन-ग्रामीण, नळाने पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणेसाठी जल जीवन मिशन, गॅस जोडणी साठी प्रधानमंत्री उज्ज्वला योजना, विद्युत जोडणी साठी सौभाग्य योजना, उपजिविकेचे साधन उपलब्ध करुन देणेसाठी राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती मिशन, उर्जेच्या बचतीसाठी महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण (महाउर्जा), इ. योजनांचा लाभ देण्यात आला.

तसेच दलित वस्ती सुधार योजना, ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजना, जिल्हा परिषद सेस, पंचायत समिती सेस, ग्राम पंचायत सेस, सीएसआर निधी इ. च्या माध्यमातून लाभार्थ्यांच्या घरकुलांना मूलभूत नागरी सुविधा जसे जोडरस्ते, अंतर्गत रस्ते, ड्रेनेज सिस्टीम, पथदिवे, इ. उपलब्ध करुन देण्यात आल्यात. प्रधानमंत्री-जनमन योजनेंतर्गत दिलेल्या पक्क्या घरकुलांसाठी सर्व लाभार्थ्यांनी शासनाने आभार व्यक्त केले आहे.



# फोटो गॅलरी


राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण
महा आवास अभियान २०२४-२५
२० लक्ष घरकुलांचा कार्यक्रम
महा आवास अभियानाची ठळक वैशिष्ट्ये


महा आवास अभियान






महा आवास अभियान - २०२४-२५
जिल्हा स्तरीय कार्यशाळा


महा आवास अभियान २०२४-२५


तालुकास्तरीय कार्यशाळा


ग्राम विकास विभाग
महा आवास अभियान-२०२४-२५
तालुकास्तरीय कार्यशाळा



## नरेंद्र मोदींनी ६० कोटी लोकांना घर, वीज, आरोग्य सुविधा दिल्या : अमित शाह

राहुलबाबा बघा, जनधन खात्यामध्ये दहा लाख नागरिकांना थेट आले पैसे!

२० लाख लाभार्थ्यांना मंजुरी पत्र वितरण व १० लाख लाभार्थ्यांना प्रथम हप्ता वितरण कार्यक्रम

## घरांना दोन लाख, तर सोलरसाठीच्या अनुदानामुळे आयुष्यभर मोफत वीज मिळणार : मुख्यमंत्री फडणवीस यांची घोषणा

## घरकुल मंजूर करताना पैसे घेतले तर तत्काळ कारवाई करू

जयकुमार गोरे : ग्रामविकास विभागाची पहिली विभागीय आढावा बैठक पुण्यात

## ग्रामीण भागात घरकुलांसाठी 'सीएसआर'ची मदत घ्या

फडणवीस यांचे निर्देश : 'पंतप्रधान आवास'चा घेतला आढावा

## हा आहे मोदींचा चमत्कार!

## नागरिकांना मोठा दिलासा! घरकुलाचा हप्ता घरबसल्या मिळवता येणार, जाणून घ्या

घरकुलाचा हप्ता घरबसल्या मिळणार!

## प्रधानमंत्री आवास योजनेच्या सर्वेक्षणाचा लाभ घ्यावा

खा. रवींद्र चव्हाण यांचे पात्र लाभार्थ्यांना आवाहन

## प्रत्येक गरजू व्यक्तीला हक्काचे घर मिळवून देऊ - पालकमंत्री

जिल्ह्यात २७ हजार ४१३ लाभार्थ्यांना घरकुल मंजुरीचे प्रमाणपत्र

## 'ग्रामीण' घरकुलांसाठी दोन लाख मिळणार

मुख्यमंत्र्यांची घोषणा : आमदार चिखलीकर यांच्या मागणीला यश

## गरिबांचे स्वप्न महायुती साकारणार

मंत्री महाजन : पंतप्रधान आवास योजनेंतर्गत दीड लाख लाभार्थ्यांना मंजुरीपत्र

## पात्र लाभार्थ्यांना प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ मिळवून द्या-आ.अब्दुल सत्तार

## मिळालेला पैसा घरासाठीच खर्च करावा

जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांचे घरकुल लाभार्थ्यांना आवाहन

## वाईत ना.मकरंद आबा पाटील यांच्या हस्ते कातकरी समाजातील कुटुंबाना जागेचे आदेश

## हाआवास'च्या लाभार्थ्यांना घरकुलचा पहिला हप्ता पोहोच

## राज्यभरातील भूमिहिनांना मिळाली घरकुलासाठी जागा

## महाआवास योजनेतील अपूर्ण घरकुले तातडीने पूर्ण करावीत

## महाआवास योजनेतील घरकूल महिलांच्या नावे करा

कालिकेयन एस. : १०० दिवसांचे सूक्ष्म नियोजन करून योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवा

## अवघ्या ३५ दिवसांतच सुरूपखानवाडीतील महिलेने बांधले हक्काचे घरकुल

जिल्ह्यातील ६२ हजार ९०० मंजुरी पत्र वाटप; मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांचे आवाहन

## लाभार्थ्यांनो १०० दिवसांत घरे पूर्ण करा

## ठाण्यात प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान

१२ हजार कातकरी कुटुंबांना मिळणार घरकुल

## घरकुलों का काम तुरंत पूरा करें : सीईओ गाडे

प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण के अंतर्गत 36 हजार लाभार्थियों के लिए आवास मंजूर

पालघर जिल्ह्यात सामान्यांच्या स्वप्नातील घरे साकारण्याचा महत्त्वाचा टप्पा पूर्ण

## ६०,२८८ घरकुलांचा शुभारंभ

## छत्रपती संभाजीनगरमध्ये पाच डेपोंवर ६१ हजार ब्रास वाळू उपलब्ध

वाळू नोंदणी गरजेची; घरकुल लाभार्थ्यांना ५ ब्रास वाळू मोफत

## सीईओंकडून ग्रामसेवकांची झाडाझडती

## मावळात बेघरांना हक्काचे घरकुल मिळणार

मावळ पंचायत समितीचे प्रयत्न : जागेचे प्रस्ताव महसूल विभागाकडे

## ६८ हजार भूमिपूजन, ४ हजार गृहप्रवेश; १३११ ग्रामपंचायतींमध्ये उपक्रम

## भूमीहीन घरकूल लाभार्थ्यांना ७० गुंठे जमीन मोफत

## घरकुलाच्या यादीतून सुटलेल्या लाभार्थ्यांचे सर्वेक्षण




मा.केंद्रीय मंत्री, गृह व सहकार मंत्रालय, भारत सरकार श्री.अमित शाह यांचे शुभहस्ते प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत लाभार्थ्यांना घरकुल मंजुरी पत्र वितरण




मा.केंद्रीय मंत्री, गृह व सहकार मंत्रालय, भारत सरकार श्री.अमित शाह यांचे शुभहस्ते व इतर मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत 'महा आवास अभियान २०२४-२५ अभियान पुस्तिका' प्रकाशन




मा.केंद्रीय मंत्री, गृह व सहकार मंत्रालय, भारत सरकार श्री.अमित शाह यांचे शुभहस्ते व इतर मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत 'महा आवास अभियान २०२४-२५ पोस्टर' प्रकाशन




मा.केंद्रीय मंत्री, गृह व सहकार मंत्रालय, भारत सरकार श्री.अमित शाह यांचे शुभहस्ते प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत एका क्लिकवर १० लाभार्थ्यांना पहिला हप्ता वितरण

"महाराष्ट्र शासनाचा एकच ध्यास,
राज्यातील सर्वांसाठी आवास"



संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय
४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन, सी. बी. डी. बेलापूर, नवी मुंबई - ४००६१४
Email ID : directoriayruralhousing@gmail.com
दुरध्वनी क्र. : ०२२-२७५६१८२४